मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक नववा



भारतीय जनता पक्षाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते श्री. नितीन गडकरी यांना 'महासम्राट' या कादंबरीच्या 'झंझावात' या पहिल्या खंडाची प्रत देताना लेखक श्री. विश्वास पाटील

महाराष्ट्रातल्या राजकीय इतिहासाला विलक्षण कलाटणी देणाऱ्या महाबंडाचा सखोल आढावा घेणाऱ्या 'ते ११ दिवस : महाराष्ट्रातील महाबंड' या पुस्तकाची पहिली प्रत माननीय मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना देताना लेखक आणि ज्येष्ठ पत्रकार श्री. जीतेंद्र दीक्षित

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक नववा

संपादक :
अखिल मेहता

संस्थापक संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
पूजा भडांगे

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

– अनुक्रमणिका –

संपादकीय	**४**
पुरस्कार	**१०**
पुस्तक परिचय	
ते ११ दिवस :	
महाराष्ट्रातील महाबंड...	**१२**
हस्तांतरण	**१८**
विशेषवार्ता	**२०**
अभिप्राय	**४२**
दिनविशेष	**६२**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

गुरूविण कोण दाखविल वाट...

स्वातंत्र्यपूर्व काळातली गोष्ट आहे. महात्मा गांधींजींच्या मिठाचा सत्याग्रहाबाबत खुद्द पंडित नेहरूंच्या वडिलांना अर्थात मोतीलाल नेहरूंनाच शंका होती की, 'बलाढ्य इंग्रजी साम्राज्यापुढे या चळवळीचा टिकाव लागून इंग्रज सरकारवर याचा प्रभाव पडेल का?' नेहरूंनी अगदी प्रांजळपणे गांधीजींना विचारलं की, ''तुम्ही मिठागरात जाऊन चिमूटभर मीठ नेण्याने काय होईल? जगभर ज्यांचं साम्राज्य पसरलंय, ज्यांची सत्ता आहे त्या इंग्रजांचे तुम्ही 'कर न देता' चिमूटभर मीठ घेतल्यानं काय मोठं नुकसान होणार आहे? त्याने आपण इंग्रजांना भारतातून परतवून लावण्यात यशस्वी होणार आहोत का?'' अशावेळी अगदी बिनतोड वाटणाऱ्या मोतीलालजींच्या प्रश्नाला उत्तर म्हणून गांधीजींनी केवळ दोन शब्द उच्चारले. म्हणाले, ''करके देखो.''

गांधीजी हे सत्याच्या आणि स्वत:च्या शक्तीवर दृढ विश्वास असलेले सत्याग्रही होते. एकंदरच जगण्यावरचा खोल अध्यात्मिक प्रभाव असलेले लोकनेते होते. या सत्याग्रहानंतर पुढे काय घडले हा इतिहास सर्वांना ठाऊक आहे. केवळ बुद्धीने केलेली कल्पना आणि आत्मविश्वासाने, श्रद्धेने केलेल्या कृतीमधले ते अंतर होते. गांधीजींनी चिमूटभर

मीठ उचलले आणि इंग्रजी सत्तेचा पाया ढासळला. नुसताच पाय ढळला नाही तर साम्राज्य संपले. आपल्या शत्रूचे हृदयपरिवर्तन घडवून आणण्याच्या गांधीजींच्या अमोघ अस्त्राचा पाया येशू ख्रिस्ताचे तत्त्वज्ञान होते. त्यांचं आवाहन जरी सत्ताधाऱ्यांना लगेच जाणवलं नसलं तरी त्याचा फार मोठा प्रभाव साऱ्या जगावर पडला. कारण 'कुणी तुझ्या एका गालात मारली तर तू त्याच्यापुढे आपला दुसरा गाल कर' या शब्दांची अमोघ शक्ती कळायला गांधीजींसारखेच मन हवे. आपण विचार करताना नेहमी चट्कन कुणीतरी आपल्याच गालात मारला आहे, अशी कल्पना करतो. आणि मग आपल्याला त्या संभाव्य अपमानाची कल्पना सहन होत नाही. त्यावर आणखी 'दुसरा गाल पुढे करण्याची लाचारी' तर आपल्याला अगदी असह्य होते. आणि म्हणून आजही लोक गांधीजींच्या या वाक्याची टिंगल करतात. परंतु परिस्थिती नेहमी दोन्ही बाजूनी बघायची असते, हेच धोरण असणाऱ्या महात्माजींनी मात्र कुणीही करणार नाही असा एक वेगळा विचार केला.

खरंतर हाच विचार प्रभू येशूलाही अभिप्रेत होता. 'कुणी तुमच्या तोंडात मारली' असा प्रभूच्या वचनाचा अगदी सरळ अर्थ न घेता 'तुम्ही कुणाच्या तोंडात मारली आणि त्याने तुमच्यापुढे दुसरा गाल केला' तर तुमची प्रतिक्रिया काय असेल हाच तो विचार! शक्यतो 'मी असं करणारच नाही' ही तर बहुतेकांची भूमिका असते पण तरीही आग्रह धरला तर अगदी आजसुद्धा कुणाही सभ्य, सुसंस्कृत माणसाचं उत्तर हेच असेल की 'मला माझ्या कृतीचा पश्चाताप होईल.'

'रागा'ची प्रतिक्रिया जेव्हा 'राग' असते, तेव्हा बदल शक्यच नसतो. उलट 'बदल शक्यच नाही' या नकारात्मक भूमिकेचीच पुष्टी अशावेळी उद्‌भवणाऱ्या प्रतिकारामुळे होते. मनमोकळी क्षमा आणि निरपेक्ष प्रेमच बदल घडवते हा येशूचा विचार सुमारे २००० वर्षानंतर गांधीजींनी राजकारणासारख्या ऐहिक विषयात आणून दाखविला. एक अशक्य क्रांती घडविली. एका वेगळ्याच पातळीवर गांधीजींनी प्रभूला आपला गुरू केले.

''गुरु बिन ज्ञान न उपजै, गुरु बिन मिलै न मोष
गुरु बिन लखै न सत्य को, गुरु बिन मैटे न दोष''

संत कबीरदास आपल्या दोह्यातून गुरु महात्म्यांचं वर्णन करताना म्हणतात,

'मोहमायेत अडकून पडलेल्या मनुष्याला मुक्ती मिळते ती केवळ एका उत्तम गुरूमुळे. गुरूने दिलेल्या ज्ञानाशिवाय त्याला सत्य उमगत नाही. त्या सत्याच्या जाणिवेनेच त्याचे सारे दोष, अवगुण मिटून जातात.'

संत कबीराचे दोहे, तुकोबारायांची गाथा किंवा प्रभू येशूचे विचार या साऱ्यातून वेगवेगळ्या टप्प्यावर एका उत्तम शिक्षकाची, मार्गदर्शकाची गरज आपलं जगणं किती सुंदर करते याची वेळोवेळी प्रचीती येते. जगाला योग आणि आयुर्वेदाची देणगी देणाऱ्या भारतीय परंपरेत तर गुरूचं फार महत्त्व सांगितलं आहे. महाभारतात एकलव्याला धनुर्विद्येतील त्यावेळच्या प्रसिद्ध गुरूंनी म्हणजे द्रोणाचार्यांनी शिक्षण देण्यास नाकारलं; पण एकलव्य डगमगला नाही, खचला नाही. त्यांने द्रोणाचार्यांनाच मनोमन आपला गुरु मानून त्यांची एक मातीची प्रतिमा तयार केली. त्या प्रतिमेसमोर उभे राहून तो धनुष्यबाणाचा सराव करू लागला व एक दिवस त्याने द्रोणाचार्यांच्या आवडत्या शिष्याला अर्थात अर्जुनालाच नेमबाजीत हरवलं. हा इतिहास आहे, कदाचित दंतकथाही असेल. पण अगदी पुतळा नाही तरी ज्ञानी माणसाचा, आपल्या आदर्शाचा, एखाद्या बोधकथेचा, ओवीचा, विधानाचा, अभंगाचा, अगदी कवितेचाही उपयोग करून एकलव्यासारखं ज्ञान मिळवता येतंच.

या आधुनिक युगात आपला गुरु आपल्याला कधी शिक्षकरुपात भेटतो तर कधी मित्रात, कधी हितचिंतकात, पालकात, मित्रात तर कधी निसर्गातल्या साध्याश्या हालचालीतसुद्धा. अशावेळी शब्दरूपातून वेळोवेळी आपली अंधारवाट उजळवत ठेवणाऱ्या पुस्तकांचा, ग्रंथरुपी शिक्षकांचा उल्लेख विसरून चालणार नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित केली गेलेली 'टू सर विथ लव्ह' ,'चिकन सूप फॉर द इंडियन टीचर्स', 'मी मलाला', 'स्टोन इन टू स्कूल' आणि नुकतेच प्रकाशित झालेले 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०- चिकित्सा' ही सर्व पुस्तके वाचकांना शिक्षक दिनाकडे बघण्याचा नवा दृष्टीकोन नक्कीच देतील, अशी आशा आहे.

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

Available on

play.google.com / store / books

www.amazon.in

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स ॲप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

मेहता पब्लिशिंग हाऊस

amazon

GET IT ON Google play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स... **eBooks**

www.amazon.in

play.google.com

https://books.apple.com



Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com

ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्रदान

'केवळ मराठी लेखकांकडूनच नाही तर राजकारणी, मराठी समीक्षक, पुरोगामी अशा सर्वांकडून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याकडे दुर्लक्ष झाले; म्हणूनच पुढील काळात त्यांच्या विपूल साहित्याचा गुणात्मक दृष्टीने विचार व्हावा आणि संशोधनाच्या वाटा शोधल्या जाव्यात.' असे मत ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनातर्फे 'अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान' या ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील यांच्या कादंबरीला ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. भारत सासणे यांच्या हस्ते 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन प्रमुख डॉ. सुनील भडंगे, मराठी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. श्यामा घोणसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी विश्वास पाटील म्हणाले की, अण्णाभाऊंचे साहित्य महाराष्ट्रातील ग्रामीण साहित्य म्हणून गणले जाते. मात्र प्रत्यक्ष त्यांच्या लिखाणाचा अभ्यास केल्यास लक्षात येईल की त्यांचे साहित्य हे भारतीय तसेच

महानगरीय साहित्य आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या या कार्यकर्त्या साहित्यिकाच्या समग्र वाङ्मयावर अभ्यास करणे गरजेचे आहे.

विश्वास पाटील यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

संभाजी	५७५
महासम्राट	६२५
नॉट गॉन विथ द विंड	४९५
क्रांतिसूर्य	१९०
बंदा रुपया	३४५
नागकेशर	४५०
गाभुळलेल्या चंद्रबनात	३९५
आंबी	२००







ते ११ दिवस : महाराष्ट्रातील बंड...

जीतेंद्र दीक्षित

अनुवाद

डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

महाराष्ट्रातील राजकीय इतिहासाला विलक्षण कलाटणी देणाऱ्या महाबंडाचा सखोल आढावा

३० जून, २०२२

एक झटका देणारी तारीख

मुंबई शहरात जर कुणी सगळ्यात भव्य घरात राहत असेल तर ते म्हणजे महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्र राजभवनाची वास्तू ही मुंबई शहराचा एक स्वतंत्र विभागच आहे जणू. मुंबई म्हटलं की, निव्वळ धावपळ, तुफान गती, गजबजाट, हे जितकं खरं आहे, तितकंच राजभवन परिसराचं नितांत सौंदर्य आणि शांतता ही देखील मुंबईची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. चारी बाजूंना प्रसन्न हिरवळ, लीलया बागडणारे मोर, इकडून तिकडे सुर्रकन दौडणाऱ्या खारी आणि समोर पसरलेला विस्तीर्ण, स्वच्छ सागर किनारा... सामान्य मुंबईकरांसाठी निव्वळ स्वर्ग ठरावा असा हा परिसर. परंतु, ३० जून २०२२च्या संध्याकाळी राजभवनातली शांतता संपून वर्दळ सुरू झाली. विशेषतः, राजभवनाच्या दरबार हॉलमध्ये तर उत्सवाचं वातावरण पसरलं होतं. सन १९११मध्ये, इंग्लंडचा राजा पंचम जॉर्ज आणि राणी मेरी यांच्या स्वागतासाठी ही वास्तू खास उभारली गेली होती. स्वातंत्र्योत्तर काळात या हॉलचा वापर राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रिगण यांच्या शपथविधीसाठी होऊ लागला. ती संध्याकाळही त्याला अपवाद नव्हती.

संध्याकाळी पावणे सातच्या सुमारास, ७५० आसनक्षमता असणारा तो हॉल तुडुंब भरला होता. उपस्थितांमध्ये उच्च पोलीस अधिकारी, राजभवनाचे कर्मचारी, पत्रकार आणि राजनैतिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर दिसून येत होते. मंच उत्तम प्रकारे सजवला गेला होता. मंचावरच्या टेबलमागे ठेवलेल्या दोन खुर्च्या नजरेत भरत होत्या. एकीवर स्थानापन्न होणार होते राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी, तर दुसरीवर विराजमान होणार होते श्री. एकनाथ शिंदे. ठीक साडे सात वाजता, राज्यपाल त्यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देणार होते. साधारण सातच्या सुमारास मंचावर अचानक लगबग सुरू झाली. राजभवनाच्या कर्मचाऱ्यांनी आधीच्या दोन खुर्च्यांच्या जोडीने एक तिसरी खुर्ची आणून ठेवली.

तिसरी खुर्ची? कुणासाठी?

नेमकं आणखी कोण शपथ घेणार आहे? सगळेच तर्कवितर्क लढवू लागले. केवळ श्री. शिंदे यांच्या शपथविधीची माहिती मिळालेली होती. मंचावर जास्तीची एक खुर्ची आणून ठेवण्यासारख्या लहानशा बाबीवरून पत्रकारांना सणसणीत बातमीचा अंदाज येतो. काहीतरी महत्त्वाची राजकीय घटना घडणार आहे, अशी चाहूल त्यांना ताबडतोब लागली. अल्पावधीतच रहस्याचा उलगडा झाला. अनेक पत्रकारांच्या मोबाईलवर भाजप अध्यक्ष श्री.

जे.पी. नड्डा यांचा खुलासा येऊन पोहोचला. त्यात त्यांनी कळवलं की, 'भाजप नेतृत्वाने श्री. देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घ्यायला सांगितलं आहे.' नड्डा यांच्या खुलाशा पाठोपाठ गृहमंत्री श्री. अमित शहा यांनी ट्विट केलं-

भाजप अध्यक्ष श्री. जे.पी. नड्डा यांच्या म्हणण्याला मान देऊन, तसंच महाराष्ट्राचं आणि इथल्या जनतेचं हित लक्षात घेऊन, श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या मनाने सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयातून त्यांनी महाराष्ट्राप्रति असणारी आपली खरी निष्ठा आणि सेवाभाव यांची प्रचिती दिली आहे. यास्तव मी त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन करत आहे.

फडणवीस यांना उपमुख्यमंत्री करण्याचा हा निर्णय जसा सगळ्यांसाठी आश्चर्यकारक होता तसाच तो खुद्द फडणवीसांसाठीसुद्धा असावा. बरोबर तीन तासांपूर्वी, राजभवनाच्या त्याच दरबार हॉलच्या समोरच्या दुसऱ्या एका हॉलमध्ये पत्रकार परिषद घेऊन फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत जाहीर केलं होतं की, एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील आणि भाजप त्यांना पाठिंबा देईल. आपण सरकारबाहेर राहणार असल्याचंदेखील फडणवीस यांनी त्या वेळेस सांगितलं होतं.

जर फडणवीस यांनी सरकारबाहेर राहण्याचं जाहीर केलंच होतं, तर अवघ्या तीन तासांत भाजपमध्ये असं नेमकं काय घडलं की, त्यांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यायला सांगण्यात आलं? असा निर्णय घेण्यापूर्वी पक्षाने त्यांच्याशी चर्चा केली नव्हती का...? फडणवीस जर मंत्रिमंडळात सहभागी होणारच होते, तर ते मुख्यमंत्री म्हणून का नाही? महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद ज्याने दोन वेळा भूषवलं आहे, महाराष्ट्र भाजपचा जो चिरपरिचित आणि सर्वांत ठळक चेहरा आहे, ज्याच्या रणनीतीने पोटनिवडणुकांसह स्थानिक निवडणुका, राज्यसभा निवडणुका आणि विधान परिषद निवडणुका या प्रत्येक निवडणुकीत भाजपला जिंकून दिलं आहे, त्या व्यक्तीची पक्षाने अशी अवनती का करावी? फडणवीस यांच्या वाढत्या प्रभावाने पक्षाला असुरक्षितता जाणवू लागली होती का? त्यांचे पंख कापण्याचा हा प्रयत्न होता का? भूतकाळात काही सभांदरम्यान 'नरेंद्र नंतर देवेंद्र?' अशा घोषणा देण्यात आल्याने, देशाचे पंतप्रधान होण्याची महत्त्वाकांक्षा फडणवीस मनात बाळगून आहेत असं पक्षाला वाटू लागलं होतं का?

प्रश्न अनेक होते आणि प्रत्येक जण आपापल्या परीने उत्तर देत होता.

पत्रकारांनी त्यांच्या भाजप सूत्रांना पटापट फोन लावले; पण तेसुद्धा चक्रावून गेले होते. महाराष्ट्र भाजपचे अनेक नेते दरबार हॉलमध्ये उपस्थित होते. पत्रकारांच्या नजरेत दाटलेलं आश्चर्य त्यांच्याही नजरेत स्पष्ट दिसून येत होतं. या निर्णयाबद्दल कुणालाच काही ठामपणे सांगता येत नव्हतं.

खरं तर, ३० जून ही तारीख एकामागोमाग एक धक्के देत होती. दुपारी साडे चार वाजता श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या पत्रकार परिषदेपूर्वी, सगळ्यांना ही आशा होती की, फडणवीस आता राज्यपालांना भेटून सरकार स्थापन करण्यासाठी दावा करतील आणि त्यानंतर जाहीर करतील की, ते मुख्यमंत्रीपदाची शपथ घेत आहेत. शिवसेनेविरुद्ध बंड करणारे एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्री केलं जाईल.... परंतु, हे काय? एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील अशी घोषणा करत फडणवीस यांनी सगळ्यांना जबरदस्त आश्चर्याचा धक्काच दिला. हा निर्णय आकलनापल्याडचा होता. कॉमन सेन्सच्या अगदी विपरीत... ज्यांचे १०६ आमदार निवडून आले आहेत, ज्यांना नऊ अपक्ष आमदारांचं समर्थन प्राप्त आहे, त्यांनी उपमुख्यमंत्रीपद का घ्यायचं? स्वतःच्या पक्षाशी बंडखोरी करून, केवळ ३९ आमदार आणणाऱ्या एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रीपद का द्यायचं? फडणवीसांच्या सांगण्यात काही गल्लत तर नाही झाली ना, असाच विचार प्रत्येकाच्या मनात थैमान घालत होता.

त्याच दिवशी सकाळी, एबीपी नेटवर्कचा वार्ताहर अक्षय भाटकरने ०९:३९ वाजता आपल्या कार्यालयाच्या व्हॉट्स ॲप ग्रूपवर बातमी पाठवली -

'एकनाथ शिंदे यांना मिळणार मुख्यमंत्रीपद! आज किंवा उद्या सरकार स्थापन करण्याचा दावा करणार! भाजप त्यांना समर्थन देणार! आतल्या गोटात चर्चा सुरू!'

अक्षयने सकाळी ही बातमी दिली, तेव्हा कुणाचाही त्याच्यावर विश्वास बसला नव्हता, तरी संध्याकाळच्या सुमारास ती बातमी खरी झाली. अक्षयच्या सूत्रांनी अगदी खरी बातमी दिली होती; परंतु त्याला बहुतांशी कुणीही पाठिंबा दिला नव्हता. या निर्णयामागे कुठला ठाम विचार आहे हे नेमकं समजत नव्हतं, त्यामुळे ही बातमी खोटी ठरण्याचा धोका होता. त्यामुळेच, चॅनेलवर ही बातमी न दाखण्याचा निर्णय घेण्यात आला. चुकीची बातमी पसरवण्यापेक्षा बातमी उशिरा पोहोचलेली अधिक बरी हाच विचार त्यामागे होता. इतकी मोठी बातमी हातात येऊनसुद्धा चॅनेलवर ती दाखवली जात नसल्याने अक्षयलाही

वाईट वाटत होतं; पण या बाबतीत चॅनेल कोणतीही जोखीम पत्करायला तयार नव्हतं.

शपथविधी प्रारंभ व्हायला केवळ पाच मिनिटं असताना देवेंद्र फडणवीस दरबार हॉलमध्ये येऊन पोहोचले. त्यांच्या चेहऱ्यावर गंभीर भाव होते. कुणी अभिनंदन केल्यास उत्तरादाखल ते बळंच हसल्यासारखं करत होते. पक्षाने घेतलेल्या निर्णयावर फडणवीस नाराज आहेत, अशी बातमी तोवर येऊन पोहोचली होतीच. शपथविधीसाठी उपस्थित राहण्याची त्यांची इच्छा नव्हती; परंतु ऐनवेळी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी फोनवरून त्यांची समजूत काढल्यानंतर ते राजभवनात येऊन पोहोचले होते.

पारंपरिक पद्धतीने, तुतारीच्या घोषात राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी दरबार हॉलमध्ये प्रवेश केला. राष्ट्रगीतानंतर कोश्यारी यांनी शपथ देण्यासाठी एकनाथ शिंदे यांना मंचावर आमंत्रित केलं, तेव्हा शिंदे यांच्या जयजयकाराने हॉल दुमदुमलाच, शिवाय दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा जयघोष झाला. बाळासाहेबांच्या स्मृतीला वंदन करून मगच शिंदे यांनी शपथ घेतली. यामागचा त्यांचा उद्देश स्पष्ट होता. बाळासाहेबांच्या सिद्धान्तांवर चालणारी शिवसेना उद्धव ठाकरे यांच्याबरोबर नसून शिंदे यांच्याबरोबर आहे हे ते त्यातून दाखवून देऊ इच्छित होते.

शिंदे यांच्या शपथविधीनंतर कोश्यारी यांनी फडणवीस यांना शपथ दिली. ज्यांनी दोन वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती, अशा देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना पाहणं अनेकांना पटत नव्हतं. २०१९ सालच्या निवडणुकीपूर्वी, विधानसभेच्या शेवटच्या सत्रात, एका कवितेचं वाचन करताना फडणवीस यांनी मोठ्या जोशात सांगितलं होतं, 'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन!' तसे ते सरकारात आलेदेखील; पण दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानत... अर्थातच, त्यांची नाराजी अगदी स्पष्ट होती.

फडणवीस यांना भलेही आनंद झाला नसेल; परंतु ठाकरे सरकार उलथवण्याच्या योजनेत त्यांच्या पक्षाला यश प्राप्त झालं होतं. अडीच वर्षांपूर्वीच्या ३५-दिवसीय राजकीय नाटकानंतर, सत्तारूढ झालेलं ठाकरे सरकार केवळ दहा दिवसांच्या घडामोडींनंतर पडलं. मात्र, ह्या दहा-दिवसीय घडामोडींचं बीज गेल्या अडीच वर्षांतच पेरलं गेलं होतं.

◆

नवी संहिता... नवा आशय...





- **चिकन सूप फॉर द सोल न्यू मॉम्स**
- **चिकन सूप फॉर द सोल न्यू मॉम्स भाग - २**

तान्ह्या मुलांप्रमाणेच, त्यांना जन्म देणारी पहिलटकरीण आई हीसुद्धा पृथ्वीवरची सुंदर निर्मिती आहे.

जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन
सुसान हॅम

अनुवाद
प्राजक्ता चित्रे

किंमत प्रत्येकी २५०रु. । पोस्टेज अतिरिक्त

ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर उलगडणार राणी इंदूमतींचा इतिहास

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांनी दि. ०९.०८.२०२२ रोजी कोल्हापूर संस्थानच्या छत्रपती शाहूमहाराज यांच्या स्नुषा, प्रिन्स शिवाजी यांच्या पत्नी आणि सासवडच्या श्रीमंत शंकरराव खाशाबा जगताप यांच्या कन्या राणी इंदुमती साहेब यांच्यावरील नुकत्याच लिहिलेल्या पुस्तकाची संहिता मेहता पब्लिशिंग हाऊसच्या रूपा मेहता यांच्याकडे सुपूर्द केली.

सुभेदार पिलाजीराव जाधवराव यांच्या जाधवगड या गढीवर पार पडलेल्या शानदार समारंभात ही संहिता प्रदान करण्यात आली. सौ. समायराराजे व सौ. संगिताराजे निंबाळकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वाघोली येथील सौ. राजश्री जाधवराव तसेच नांदेड येथील सौ. गायत्री जाधवराव देखील या सोहळ्याला उपस्थित होत्या. डॉ. मनिषा पाटील, डॉ. अनुराधा देशमुख यांच्यासह गोधडीला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणाऱ्या कोल्हापूर येथील उद्योजिका सौ. स्मिता खामकर, सौ. सुलेखा शिंदे, सौ. तेजला दाभाडे, सौ. मृणाल गायकवाड, सौ. शिवांजलीराजे नाईक निंबाळकर, सौ. हेमलता राजेभोसले, सौ. अनिता भोसले, आणि कोल्हापूरच्या कवयित्री सौ. अपर्णा पाटील याही उपस्थित होत्या. पुरंदरच्या वतीने सरदार गोदाजीराव जगताप यांच्या वंशातील स्नुषा

डॉ. वृषाली जगताप यांनी उपस्थितांचे स्वागत केले; तर माजी कृषिराज्य मंत्री नामदार दादासाहेब जाधवराव यांनी या सोहळ्याला आवर्जून उपस्थिती दर्शवून राणी इंदुमती या पुस्तकासाठी लेखिका डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांना शुभेच्छा दिल्या.

यानंतर डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सासवडला भेट देत डॉ. दीपक जगताप यांच्या 'जगताप हॉस्पिटल' तसेच त्यांच्या वाड्याला अर्थात 'सरदार गोदाजीराव जाधव' यांच्या वाड्याला भेट दिली. वाड्याच्या प्रवेशद्वाराचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर 'सरदार गोदाजीराव जगताप प्रतिष्ठान'चे अध्यक्ष मा. दीपकराव जगताप व मा. अभिजीत जगताप यांच्या उपस्थितीत 'सरदार गोदाजीराव जगताप' यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. यावेळी डॉ. वृषाली जगताप यांनी त्यांचा कौटुंबिक सत्कार केला. शंकरराव खाशाबा जगताप आणि इंदूमती राणीसाहेब यांच्याही जन्मठिकाणी भेट देऊन अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत मा. गिरीश जगताप यांनी केले तर सोहळ्याची सांगता श्री संत सोपानदेव मंदिरास भेट देऊन करणात आली.

◆



जगातील पहिली आजींची शाळा

शिक्षकाला राष्ट्र निर्माणकर्ता म्हणतात. शिक्षकांची जबाबदारी ही आहे की, विद्यार्थ्यांना जगण्याच्या सर्व कलेत पारंगत होतील आणि समाजात सभ्य नागरिक म्हणून वावरतील. त्याद्वारे एक मजबूत समाज आणि राष्ट्र निर्माण करू शकतील. देशाचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा वाढदिवस दरवर्षी शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची आठवण म्हणून एका कर्तव्यदक्ष शिक्षकाची घेतलेली भेट अजूनही माझ्या मनात रुंजी घालत आहे.

एका सिनेमाच्या निमित्ताने लोकेशन शोधत असतांना आजींच्या शाळेबद्दल माहिती मिळाली. मी व दिग्दर्शक युसूफ खान आम्ही त्यावेळी पहिल्यांदा ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील 'फांगणे' गावात गेलो आणि मग या शाळेबद्दल आगळीवेगळी माहिती मिळाली. नमस्कार करून सांगणे, गावाचे नाव फांगणे' असा गावाच्या सुरवातीला फलक बघून उत्सुकता वाढू लागली. एक अनोखी शाळा म्हणून मुरबाड तालुक्यातील 'फांगणे' गावाची 'आजीबाईची शाळा' जगाच्या कानाकोपऱ्यात प्रसिद्ध आहे. गुलाबी रंगाच्या नऊवारी साड्या नेसलेल्या, नथ घातलेल्या आजीबाई पाठीवर दप्तर घेऊन रोज दुपारी शाळेत जातात. या गावच्या सरकारी शाळेतील एक शिक्षक योगेंद्र बांगर सर यांच्या कल्पनेतून ही शाळा सुरु झाली. तेव्हाच या विषयावर सिनेमा करायचा हे ठरवले आणि या सिनेमाच्या निमित्ताने फांगणे गावात जाणे-येणे सुरू झाले. योगेंद्र बांगर सरांची भेट म्हणजे

एक विद्यापीठ आहे. या शाळेत असलेले विद्यार्थी लहान मुलं नाहीत, तर चक्क वयस्कर आजीबाई आहेत. आयुष्यभर काबाडकष्ट करुन थकलेले हात आता बाराखडी गिरवत आहेत. लहान मुलांना लाजवेल अशा उत्साहात आजीबाई शाळेत येतात. गुलाबी साडीतल्या आज्जीबाई सिनीअर विद्यार्थिनी, तर पिवळ्या साडीतल्या आज्या या ज्युनिअर. या शाळेनं आजींबाईच्या आयुष्यात जादूच घडवली आहे. या शाळेतले सगळ्या आज्ज्या सत्तरी ओलांडलेल्या. विशेष म्हणजे या वयातही या आजींचे पाठांतर अगदी खणखणीत आहे. आयुष्याच्या सांजवेळी शिक्षणाची कास धरणाऱ्या या साऱ्या आजीबाई अनेकांसाठी आदर्श ठरत आहेत.

रोज दुपारी पावणे दोन-दोनच्या सुमारास ''चल...ये अनुसया'' यांसारख्या आरोळ्या एकमेकींना देत गुलाबी रंगाची साडी नेसलेल्या, एका हातात लाल-काळ्या रंगाचं दप्तर, दुसऱ्या हातात काठी; नाहीतर नातवंडांचा हात आधारासाठी घेऊन सगळ्या आजीबाई शाळेची वाट चालू लागतात. बरोबर आणलेल्या दप्तरात एक पाटी, अंकलिपी, पेन्सिल आणि पाटी पुसायचं फडकं घेऊन न चुकता दररोज शाळेत येतात. ८ मार्च २०१६ पासून सुरू झालेली भारतातीलच काय जगातील ही पहिली आजीबाईंची शाळा मोठ्या उत्साहात आणि आनंदात सुरू झाली. ही शाळा म्हणजे 'बिनभिंतीची उघडी शाळा, लाखो इथले गुरू,

झाडे, वेली, पशु-पाखरे यांशी दोस्ती करू' या ग. दि. माडगूळकरांच्या गाण्याचा प्रत्यक्ष अनुभव! शाळा निसर्गाच्या सान्निध्यात वसली आहे. आंब्याच्या मोठ्या झाडाखाली बांबूच्या कळकांचे दोन भाग करून भिंत तयार करण्यात आली आहे. त्यावर गव्हाच्या कुडाचे छत आहे. वर्गाच्या समोर ठरावीक अंतरावर प्रत्येक आजीच्या नावाचे झाड आहे. टाकाऊ फरश्यांचा वापर करून त्यावर मुळाक्षरे लिहिलेली आहेत. वयाच्या साठीनंतर उत्साहाने पुस्तकातील धडे गिरवणाऱ्या आजीबाईंच्या शाळेचे ते चित्र मोहीत करून टाकणारे असते. वर्गात शिरताच, समोरील फळ्यावर दिनांक-वार यांसह लिहिलेला 'शिक्षणाला वयाचं बंधन नसतं' हा सुविचार लक्ष वेधून घेतो. फळ्याच्या समोर सरळ रांगेमध्ये डोक्यावरील पदर सावरत मांडी घालून बसलेले 'विद्यार्थी' असतात. मांडीवर पाटी, समोर दप्तर, त्या दप्तरावर 'बालमित्र'ची अंकलिपी, दप्तराच्या बाजूला पाटी पुसण्याचे फडके अन् हातात पेन्सील या सगळ्या साहित्यासह ते 'विद्यार्थी' अर्थात सर्व आजी मुळाक्षरे गिरवण्यात दंग असतात. काही वर्षांपासून शिक्षण घेणाऱ्या आजी या शाळेत चांगल्या रमून गेल्या आहेत! त्यांच्यासाठी ती शाळा म्हणजे उतरत्या वयातील संवाद साधण्याचे, त्यांच्या मैत्रिणींना भेटण्याचे, खळखळून हसण्याचे, भरपूर गप्पा मारण्याचे हक्काचे ठिकाण होऊन गेले आहे. आजी दररोज दुपारी दोन ते चार शाळेतील अभ्यासानंतर अभंग, ओव्या अन पाढेही म्हणतात. तसे करताना एक आजी आधी म्हणतात. नंतर, बाकी साऱ्या पहिल्या आजीमागे शिस्तीत म्हणत असतात.

वर्गासमोर लावण्यात आलेल्या झाडांमधील प्रत्येक झाडाचे पालकत्व एकेका आजीकडे देण्यात आले आहे. त्या त्या झाडासमोर आजीच्या नावाची पाटी लावण्यात आली आहे. शाळेच्या नियमानुसार, आज्यांना त्या झाडांची पाणी, खत घालून जोपासना करण्याचे, झाडांची काळजी घेण्याचे काम करावे लागते. या शाळेसाठी गावातील शिक्षिका शीतल मोरे मॅडम देखील मदत करतात. सुनंदा केदार आजी म्हणतात, 'या शाळेमुळं खरंतर आमचं एकमेकींना नियमानं भेटणं व्हतं, नाहीतर जी ती आपापल्या घरी असायची; भेटायचं म्हटलं, की स्वतःहून येळ काढून भेटायला जावं लागायचं. शाळेमुळे चार अक्षरं शिकायला बी मिळत्यात. या वयात तेवढाच काय तो इरंगुळा...' आमच्या बालपणी गरिबीमुळं शिक्षण नाय घेता आलं. पुढं आई-वडिलांचं कष्ट आमच्या वाट्याला आलं. मात्र, आपण शिकाय पाहिजे व्हती चार बुकं, असं

नेहमी वाटायचं,' असं ६७ वर्षांच्या यमुना केदार आजी सांगतात. त्या म्हणतात, ''बांगर गुरुजींनी सुरू केलेल्या या आजीबाईंच्या शाळेमुळं म्हाताऱ्या वयात का व्हयना, पण शिकायला मिळालं याचा लय आनंद वाटतू.'' याच शाळेत शिकणाऱ्या ७० वर्षांच्या अनुसया आजी सांगतात, ''शिक्षण नसल्यामुळं कधी कुठं सय मागितली तर अंगठा मारावा लागायचा. शाळेचं तोंडच कधी बगितलं नसल्यामुळं नाव लिहायला येतं नव्हतं. मग सय तर लय लांबची गोष्ट... पण आता मला माझं नाव लिहायला येतं अन सय पण करती.''

योगेंद्र बांगर सर हे मूळचे मुरबाड तालुक्यातील शेलारी गावचे. २०१२ साली आदिवासी दुर्मीळ डोंगराळ भाग या गटात मोडणाऱ्या 'फांगणे' गावातील सरकारी शाळेत शिक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. खरंतर अशा दुर्गम ठिकाणी नियुक्ती होणे म्हणजे एक शिक्षा मानली जाते. पण त्याला शिक्षा न मानता भगवंताचा प्रसाद म्हणून काम केलं तर निश्चित एकरूपता येते. इथे फक्त सत्तर-एकाहत्तर कुटूंब राहतात. कोणतीही बस इथं पोहचत नाही. पाचवीच्या पुढे शिकायचं असेल तर मुलांना १५ किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. हॉस्पिटल, बँकांसाठीही १५ किलोमीटर जावे लागते. इथे नोकरीस आल्यावर बांगर सरांना या गावासाठी काहीतरी करावेसे वाटले. नंदनवनात झाड कोणीही लावतं, पण वाळवंटात ओऑसिस निर्माण होणं महत्वाचं आहे. सुरुवातीला त्यांनी शाळेच्या विकासावर लक्ष दिलं. २०१३ साली गावात ७० शौचालये बांधून गाव हागणदारीमुक्त केलं. पर्यावरणाच्या रक्षणासाठी घर तिथं कडुलिंब, घर तिथं शेवगा, घर तिथं सीताफळ असे उपक्रम राबवले. गावच्या या प्रगतीमध्ये दिलीपभाई दलाल यांचा फार मोठा सहभाग आहे. अंबरनाथ

मधील ते एक उद्योजक. महिलांच्या डोक्यावरचा हंडा कसा उतरवता येईल यासाठी त्यांनी दिलेल्या आर्थिक मदतीमधूनच गावात पाण्याची पाईपलाईन आली. शिवजयंतीच्या निमित्ताने आयोजित पारायण सोहळ्यात त्यांची गावातील महिलावर्गाशी गाठ पडली आणि त्यातूनच शिक्षणाची देवाणघेवाण करूया म्हणत 'आजींची शाळा' जन्माला आली.

अहो खरंच शिक्षणाला वय नसतं आता तर जानेवारी २०१८ मध्ये शेलारी गावात आजीबाईंच्या शाळेसोबत आजोबांची शाळाही सुरू झाली. आजीबाईंच्या हाती पाटी पुस्तक देणाऱ्या आजीबाईंच्या शाळा कोरोनाकाळात बंद होती. पण त्यांचा ऑनलाईन संवाद सुरू आहे. नातवंडांसह धडे गिरविण्याची संधी आजींना दिली गेल्याने दोन पिढ्या एकत्र येऊन ऑनलाईन शिक्षणाची वाट धरत आहेत. विविध उपक्रमांतून या वयात आजी-आजोबांना शिकवत त्यांना समृद्ध करण्याचे काम सध्या शिक्षक योगेंद्र बांगर यांच्या माध्यमातून सुरू आहे. याची दखल घेत मुंबईच्या 'जेडी आईस' संस्थेने 'आजींची शाळा' विषयावर चित्रपट निर्मिती करण्याचे ठरवले. लवकरच ही आगळीवेगळी 'आजींची शाळा' मोठ्या पडद्यावर अनुभवयाला मिळेल. यामुळे फांगणे गावात चैतन्याचे वातावरण पसरले आहे.

फांगणे गावात आजीबाईंच्या शाळेचा प्रयोग पाच वर्षांपूर्वी केला गेला असून आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्याची दखल घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या स्वयंसिद्ध गाव संकल्पनेसाठी या गावाची निवड झाली असून गावातील इतर सुविधांसह आता शैक्षणिक प्रगतीत समावेश करण्यात आला आहे. या आजींच्या शाळेची 'लिम्का वर्ल्ड रिकॉर्ड' मध्ये नोंद झाली आहे. आजींच्या या शाळेबरोबर आता आजोबांची शाळा पण या गावात भरते. गावातील अनेक सुविधा शिक्षणामुळे झाल्या आहेत. शिक्षणाला वय नसतं हे यावरून सिद्ध होते. अशा एका अभूतपूर्व विषयावर मला सिनेमा लिहायला मिळाला आहे, हे मी माझे भाग्य समजतो. मोठ्या पडद्यावर हा सिनेमा यथावकाश आपल्या भेटीला येईलच. मात्र ही जबराट 'आजीबाईंची शाळा' खूप काही शिकवणारी आणि साद घालणारी आहे. त्यासाठी प्रामाणिकपणे धडपडणाऱ्या योगेंद्र बांगर सर यांना मनापासून सलाम व त्यांच्या पुढील कार्यास आभाळभर शुभेच्छा.

– आशिष निनगुरकर

जिद्द असावी तर अशी
व्यंगत्त्वावर मात करणाऱ्या शिक्षिकेची प्रेरणादायी कहाणी'

प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची आणि विशेष असते. आपल्या विद्यार्थ्यांना उत्तम नागरिक बनवण्यासाठी शिक्षक खूप महत्वाची भूमिका बजावतात. अशात काही शिक्षक समोर येणाऱ्या असंख्य संकटांवर मात करत जिद्दीने हातात खडू उचलतात तेव्हा ते अधिक विशेष बनतात. आपल्या जिद्द मात्र अपंगत्वावर मात करत कोरोना काळात आदिवासी भागात ज्ञानदानाचे धडे देणाऱ्या विक्रमगड तालुक्यातील कऱ्हे येथील प्रतिभा हिलीम या शिक्षिकेची कहाणी खूपच प्रेरणादायी आहे.

हल्ली असं एकही क्षेत्र नाहीये की ज्यात महिलांनी आपली छाप पाडलेली नाही. अशीच एक प्रेरणादायी कहाणी विक्रमगड तालुक्यातील कऱ्हे येथील शरीराने अपंग असलेल्या कर्तृत्ववान शिक्षिका प्रतिभा हिलीम या शिक्षिकेची आहे. आयुष्यात सर्व काही मिळूनही कण्हत कण्हत जगणारी माणसं या

जगात आहेत. मात्र आपल्या आयुष्यात शारीरिक कमतरता असतानाही आनंदी जीवन जगणारी माणसेही आहेत. एका जिद्दी, हुशार, कष्टाळू व समर्पण भावनेने ज्ञान दानाचे कार्य करणाऱ्या एका शिक्षिकेची ही कहाणी निश्चितच प्रेरणादायी ठरणारी आहे.

प्रतिभा हिलीम या शिक्षिका म्हणून ठाणे जिल्ह्यातील भिवंडी पंचायत समिती अंतर्गत राहनाळ येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत असताना २०१९ साली तापासारख्या आजाराने त्या आजारी पडल्या. हा आजार एवढा बळावला गेला की, आजारात त्यांना आपले दोन्ही हात पाय अर्ध्यातून गमवावे लागले, मात्र एवढे मोठे संकट आले तरीही त्या खचल्या नाहीत. २७ वर्ष शिक्षकी पेशा असलेल्या हिलीम यांना स्वस्त बसून देत नव्हता. त्यांचे मूळ गाव विक्रमगड तालुक्यातील कऱ्हे असल्यामुळे आपण गावाच्या ऋणात आहोत याची जाणीव ठेवून त्या आपल्या गावी आल्या.

त्यानंतर मधल्या काळात कोरोनाच्या जागतिक संकटामुळे शाळा बंद झाल्या. शाळा सुरु करण्याजोगी परिस्थिती कधी निर्माण होईल, हेही सांगता येणे कठीण झाले होते. शाळा सुरु झाल्याच तरी, सामाजिक अंतराचे नियम काय असतील आणि ते पाळून शाळा पूर्ववत चालवता येतील का, हेही सांगता येणे कठीण झाले. सरकारने शाळा ऑनलाईन सुरु करायला परवानगी दिली. अनेक शाळांनी कोणत्या ना कोणत्या पद्धतीचे, ऑनलाईन उपक्रम सुरु

देखील केले. परंतू ग्रामीण भागात नेटवर्क नसणे, पालकांकडे एंड्राइड मोबाईल नसणे यामुळे अनेक विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित आहेत ही बाब त्यांच्या लक्षात आली.

या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेतून येथील विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांनी ज्ञानदानाच्या कार्याला सुरुवात केली. आपल्या अपंगावर यशस्वीपणे मात करत जे विद्यार्थी आज ऑनलाइन शिक्षणापासून वंचित आहेत अशा विद्यार्थ्यांना शिकविण्याचे कार्य त्या करीत आहेत. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या साधारणपणे २५ विद्यार्थ्यांना शिकवायला सुरवात केली. आता त्यांच्याकडे ३० ते ३५ विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. आपल्या हाताच्या बेल्टला पेनाचे टोपण लावून त्यात खडू वापरून त्या विद्यार्थ्यांना शिकवितात. शिक्षक दिनानिमित्त अपंगत्वावर मात करत कोरोना काळात आदिवासी भागात शिक्षिकेचे हे ज्ञानदानाचे कार्य खरोखरच सर्वांना प्रेरणा देणारे आहे.

त्या म्हणतात की, ''कोरोना महामारीच्या काळात सरकारने शाळा ऑनलाईन सुरु करायला परवानगी दिली. परंतू ग्रामीण भागात नेटवर्क नसणे, पालकांकडे एंड्रॉइड मोबाइल नसणे यामुळे अनेक विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित आहेत ही बाब माझ्या लक्षात आली आणि मग या विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम सुरु केले.

– अमोल सांबरे

'देशातील पहिली मुलींची शाळा' म्हणून पुण्यातील 'भिडे वाडा' सरकारने 'ऐतिहासिक वास्तू' म्हणून जतन करावा!

महात्मा फुलेंची शाळा सुरु होण्यापूर्वीच शाळेला विरोध सुरु झाला होता. विरोध जसाजसा वाढत गेला गोविंदराव फुलेंनी अंगावरील कपड्यानिशी ज्योतिरावांना घराबाहेर काढले. अंगावरील कपडे अन् सोबतीला पत्नी यापलीकडे ज्योतिरावांकडे काहीच नव्हते. अशा बिकट प्रसंगी ज्योतिरावांच्या मदतीला धावून येणारा त्यांचा बालपणीचा जिवलग मित्र म्हणजे उस्मान शेख. शेख यांनी ज्योतिरावांना आपले गंजपेठेतील राहते घर दिले. इतकेच काय तर

संसारासाठी लागतील म्हणून भांडीकुंडी अन् कपडेही दिले. सर्व प्रकारची मदत देऊ केली. ज्यामुळे ज्योतिरावांची शाळा उस्मान शेखच्या घरात भरू लागली. वर्ग वाढू लागले तर उस्मानने आपल्या बहिणीला सांगून सावित्रीबाईची मदत केली. सावित्रीबाईच्या सोबतीला शिक्षिका म्हणून काम करणारी पहिली स्त्री फातिमा शेख होती. फातिमा शेख सुशिक्षित होती, शिकवायचे कसे याचे प्रशिक्षण सावित्रीबाईंकडून घेऊन ती शिक्षिका म्हणून काम करू लागली.

''विद्येविना मती गेली, मती विना नीति गेली,
नीतिविना गती गेली, गती विना वित गेले,
वित्ताविना शुद्र खचले, इतके सारे अनर्थ एक अविद्येने केले!''

१९ व्या शतकातील पहिले बंडखोर समाजसुधारक, महात्मा ज्योतीराव फुले यांनी शिक्षणासंबंधीचे मांडलेले हे विचार म्हणजे आजच्या काळात ही प्रत्येकाने अंगीकारावा असा मूलमंत्र आहे! मानवी स्वातंत्र्याकडे आणि समतेकडे नेणारा विचार सांगून महात्मा फुले थांबले नाहीत तर त्यांनी प्रत्यक्ष कृतीद्वारे स्त्री शिक्षणासाठी व अस्पृश्यता निवारणासाठी अहोरात्र कष्ट उपसले. त्यांच्याबरोबर त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्या पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणासाठी प्रसंगी मानहानी स्वीकारली पण घेतला वसा टाकला नाही. त्यांनी १८५१ मध्ये मुलींसाठी या देशातील पहिली शाळा सुरु केली. स्त्री शिक्षणाचा पाया सावित्रीबाईंनी व महात्मा ज्योतिराव फुल्यांनी घातला. स्त्री शिक्षणाची सुरूवात करताना त्यांना अतोनात कष्ट सोसावे लागले, दु:ख

नवी संहिता... नवा आशय...

- **चिकन सूप फॉर द सोल काउंट युवर ब्लेसिंग्ज**
- **चिकन सूप फॉर द सोल काउंट युवर ब्लेसिंग्ज - भाग २**

व

कृतज्ञता, मनोधैर्य, सहनशक्ती आणि रुपेरी कडा
याविषयीच्या गोष्टी

जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन /
एमी न्यूमार्क / लॉरा रॉबिन्सन / एलिझाबेथ ब्रायन

अनुवाद

शुभदा अभ्यंकर

किंमत प्रत्येकी २६०रु. । पोस्टेज अतिरिक्त

वाट्याला आले, अपमान गिळावे लागले.

भारतात त्या काळात प्रचंड निरक्षरता होती, 'स्त्रीया जर शिकल्या सवरल्या तर त्या संसार करणार नाहीत, त्या बिघडतील, स्त्रियांनी शिकू नये ही त्या देवाचीच इच्छा आहे.' अशा प्रकारच्या तत्कालीन समाजात अंध समजुती होत्या. पुरुषी अहंकार बळावल्यामुळे स्त्री शिक्षणाला समाजातील एक फार मोठा वर्ग सातत्याने प्रखर विरोध करीत होता. अशा प्रतिकुल परिस्थितीमध्ये अत्यंत धाडसाने व मनोनिग्रहाने फुले दाम्पत्यांनी पुण्यातील भिडे वाड्यात या देशातील पहिली मुलींची शाळा सुरु केली. त्यासाठी सावित्रीबाईंनी अत्यंत हालअपेष्टा सोसल्या व मानहानीच्या प्रसंगांना तोंड दिले. तत्कालीन समाजाने सावित्रीबाईंना अक्षरश: शेणाचे गोळे मारले, अपमानकारक टोमणे मारले व प्रत्यक्ष दगडधोंडे मारुन त्यांच्या कार्याला प्रचंड विरोध केला, मात्र समाजाकडून होणारा कडवा विरोध झेलत व शिव्याशाप ऐकत सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाचे घेतलेले व्रत सोडले नाही. तत्कालीन समाजात स्त्रीने घराच्या उंबऱ्याच्या बाहेर येणे निषिद्ध मानले जात होते. अशा वेळी सामान्य घरातली एक स्त्री उंबऱ्याबाहेर पडून स्त्री शिक्षणाचा वसा घेऊन चालत आहे, हे चित्र अगदीच आगळेवेगळे होते, ते तत्कालीन समाजाला न पटणारे व न बघवणारे होते, त्यामुळे शाळेत जातांना त्यांच्यावर काही टोळभैरवांनी व गुंड प्रवृत्तीच्या समाज कार्यकर्त्यांनी मुद्दाम चिखल व शेणाचा मारा करुन त्यांना मुलींच्या शिक्षणाच्या घेतलेल्या व्रतापासून परावृत्त करण्याचा निकराने प्रयत्न केला होता. त्यांच्यावर भलतेसलते आरोप करुन त्यांना खजिल करण्याचाही प्रयत्न केला. पण अशा वेळी सावित्रीबाई त्यांना नम्रपणे उत्तर देत की, ''मी माझ्या भगिनींना शिक्षण देण्याचे पवित्र कार्य हाती घेतले आहे, ते मी कदापीही सोडणार नाही, तुम्ही जे माझ्यावर भलतेसलते आरोप करता, माझ्यावर शेण व चिखल तसेच दगडधोंडे टाकीत आहात ते मला फुलांप्रमाणे वाटतात!''

वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी ज्योतिरावांनी या ऐतिहासिक कार्याला सुरुवात केली. या कार्यात त्यांना शब्दश: सावलीप्रमाणे खंबीर साथ देणारी त्यांची पत्नी सावित्रीबाई होती अवघ्या १८ वर्षाची. मुलींची शाळा सुरु केल्याबद्दल आप्तनातलगांनी त्या दोघांना वाळीत टाकले, त्यांच्या घरीही कोणी येईना. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष ज्योतिरावांच्या वडिलांनी या दोघांना घरातून बाहेर काढले; त्यामुळे शाळेसाठी जागा कोणीही देईना, भाड्याने जागा

घ्यावी म्हंटले तर खिशात पैशाची वानवा होती. ज्योतिरावांची जिद्द वाखाणण्याजोगी होती, हे पाहून पुण्यातील भिडे नावाचे सद्‌गृहस्थ की, जे ज्योतिरावांचे स्नेही होते, त्यांनी आपला वाडा या कार्यासाठी उपलब्ध करुन दिला. भिडे यांचे धारिष्ट्य खरोखरच वाखाणण्याजोगे होते. ज्योतिरावांच्या शिक्षणप्रसाराच्या कार्यात भिडे व त्यांच्या कुटुंबियाचे सहकार्य आणि मदत मोलाची आहे. त्यांच्यामुळेच फुले दाम्पत्यांना पुण्यासारख्या सनातनी विचाराच्या कर्मठ शहरात शिक्षणप्रसाराचे कार्य करता आले, हे आपणास विसरुन चालणार नाही.

याच भिडे वाड्यात ज्योतिराव व सावित्रीबाईंनी मुलींची पहिली शाळा ३ जुलै १८५१ रोजी सुरु केली, पुढे चांगला प्रतिसाद मिळतो आहे हे लक्षात आल्यावर १७ सप्टेंबर १८५१ व १५ मार्च १८५२ मध्ये दोन शाळा चालू गेल्याचा उल्लेख आढळतो, तसेच या शाळेत अनुक्रमे ४८, ५१, ३३ इतक्या मुली शिकत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या शाळांची प्रथम वार्षिक परीक्षा दि. १७ फेब्रुवारी १८५६ रोजी झाल्याची नोंद आढळते. या परीक्षा बघायला पुण्यातील नागरिकांनी अभूतपूर्व अशी गर्दी केल्याचीही नोंद आहे.

समाजसुधारणा, शिक्षणप्रसार व सुधारणावादी विचारांचे प्रबोधन या गोष्टी एका सामान्य समाजात जन्माला आलेल्या ज्योतिरावांनी व सावित्रीबाईंनी केले आहे. अर्थात टिळक-आगरकर-कर्वे-गोखले या पुण्यातील समाजसुधारकांचा त्या वेळी जन्मही झालेला नव्हता. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची भूमी नांगरुन मशागत करण्याचे महत्त्वाचे काम फुले दाम्पत्यांनी केले, ही गोष्ट

भूषणावह आहे. तद्वतच भिडे कुटुंबियांनी फुले दाम्पत्यांना आपला वाडा मुलींच्या शाळेसाठी उपलब्ध करुन देणे हे त्या वेळच्या परिस्थितीचा अभ्यास केला तर किती महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात येईल. या सर्वच गोष्टींना ऐतिहासिक मुल्य आहे. या देशातील स्त्री-शुद्रादीसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडे करणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाईंनी ज्या भिडे वाड्यात स्त्री शिक्षणाची पहिली मुहूर्तमेढ रोवली, तो 'भिडे वाडा' फडणवीस सरकारने 'ऐतिहासिक वास्तू' म्हणून जतन करायला हवा! आणि फुले दाम्पत्यांबरोबरच भिडे यांच्या त्यागालाही अभिवादन करायला हवे असे सुचवावेसे वाटते!

(लेखक आचार्य बाळशास्त्री जांभेकर 'दर्पण' पत्रकार पुरस्कारांने सन्मानित असून लोकसाहित्याचे अभ्यासक आहेत.)

– सुनीलकुमार सरनाईक

फ्लोटिंग स्कुल - तरंगणारी शाळा

१० वर्षांपूर्वी जेव्हा ब्राझिलमध्ये पहिल्यांदाच जहाजावर गेलो होतो. अजूनही आठवतंय आयुष्यातील पहिलाच विमानप्रवास तोही एमिरेट्सच्या विमानाने. क्रिकेट मॅच किंवा टेनिस मॅच बघताना फ्लाय एमिरेट्सची जाहिरात बघायचो तेव्हा काही कळायचं नाही की फ्लाय एमिरेट्स म्हणजे नक्की काय प्रकार आहे. जेव्हा एमिरेट्सच्या विमानात बसलो आणि प्रत्यक्ष आकाशात उडालो तेव्हा कळले फ्लाय एमिरेट्सची एवढी जाहिरात का करतात ते.

ब्राझीलच्या साओ पाउलो या शहरात जायचे होते, ज्या शहराचे नाव पहिल्यांदाच ऐकत होतो. त्या शहरात जाण्यासाठी दुबईला उतरून पुन्हा एकदा एमिरेट्सच्याच विमानाने जायचे होते. मुंबई ते दुबई तीन ते साडेतीन तास काही वाटले नाही. विंडो सीट नव्हती तरीपण; दुबईला विमान खाली उतरत असताना विंडो सीटवर बसलेल्या युरोपियन व्यक्तीने दुबईतील 'पाल्म जुमेरा' या मानवनिर्मित बेटाचे दर्शन घडवून आणले. काही तासानंतर दुबईहून साओ पाउलोसाठी विमान होते. फ्लाईट डीटेल्स वरून अगोदरच कल्पना होती की, पुढचा प्रवास नॉनस्टोप अठरा तासांचा आहे. विमान नॉनस्टोप अठरा तास उडू शकते, हे सुद्धा मला माहिती नव्हते; त्यामुळे एका खुर्चीत

अगोदर साडेतीन तास आणि नंतर अठरा तास बसून प्रवास करावा लागेल या कल्पनेने बेजार झालो होतो. मुंबई ते दुबई भारतीय पद्धतीचे जेवण असल्याने काही वाटले नव्हते. पण नंतर ब्राझील आणि अरेबिक खाद्यपदार्थ असणारा मेन्यू बघून जास्त बेजार झालो. फक्त मस्का पाव, फळे आणि हंडी असली तरच पोटात काहीतरी ढकलायची इच्छा होत होती.

कसाबसा सलग अठरा तासांचा प्रवास पूर्ण करून ब्राझीलच्या साओ पाओलो शहरात उतरलो. इथून पुन्हा एकदा ब्राझिलमध्ये डोमेस्टिक फ्लाईट पकडून २ तासांच्या अंतरावर असलेल्या बेलेम या शहरात उतरायचे होते. ट्याम इर्वेज च्या लहान विमानाने बेलेमला पोचलो. रात्र झाली होती त्यामुळे तिथला एजंट हॉटेलवर सोडायला आला होता. जाताना रस्त्यात घोळका घोळक्यात लोकं दिसत होती. काहींच्या हातात तर पिस्तुल वगैरे पण दिसत होतं. जाताना एजंट मोडक्या, तोडक्या आणि बोबड्या इंग्रजीत बोलून गेला, 'माय फ्रेंद, दोन्त गो आऊत, थिस इस माफिया एरिया.' दुसऱ्या दिवशी सकाळी एजंट येऊन बोलला की जहाजाने मध्यरात्री शहर सोडले आहे. आपण इमिग्रेशन फोर्म्यालीटी करून बार्करेना नावाच्या शहरात कार ने जाऊ, तिथे जहाज संध्याकाळपर्यंत पोचणार आहे.

इमिग्रेशन क्लियर होऊन कारने जवळपास ३ तासांचा प्रवास करून जहाजावर पोचलो एकदाचा. हा प्रवास अत्यंत अविस्मरणीय असा होता, कारण कारने जाताना ब्राझिलचे अप्रतिम निसर्ग सौंदर्य पाहायला मिळाले. सगळीकडे हिरवेगार मैदान आणि त्यांच्या कडेला हिरवेगार मोठे मोठे वृक्ष. या मैदानांवर गुरढोरं, डुकरं चरताना दिसायची. ब्राझील बीफ आणि पोर्कचा निर्यातदार देश असल्याने ते साहजिकच होतं.

लहान असताना जेव्हा आठवतंय तेव्हापासून जेव्हा जेव्हा भाऊच्या धक्यावरून रेवस मार्गे मंडव्याला मामाकडे जाताना समुद्रात उभ्या असलेल्या मोठमोठ्या बोटी आणि टेकड्यांसारखे विशाल जहाजं बघत जायचो त्या जहाजावर दिसणारे खलाशी लौन्च जवळ आली की प्रवाशांना हात उंचावून दाखवायचे. मी लहान असताना लौन्चमधून त्या खलाशांचे जीवन कसे असेल, ते काय करत असतील याची कल्पना मनातल्या मनात करत असायचो. पण लहानपणी रंगवलेल्या कल्पना वयाच्या पंचविसाच्या वर्षी अचानकपणे ध्यानीमनी नसताना प्रत्यक्ष अनुभवायला मिळाल्या. परंतु काल्पनिक

आणि वास्तविक जीवनातला फरक हळूहळू स्पष्ट होत गेला. एका वर्षाच्या ट्रेनिंग मध्ये भारतीय नौसेनेच्या जहाजांवर जाण्याचा योग आला होता कारण प्री सी ट्रेनिंगमध्ये वर्कशॉप ट्रेनिंग हा अभ्यासक्रम मुंबई नेव्हल डॉकयार्ड येथे मिळाला होता.

आय एन एस विराट, मुंबई, दिल्ली, अजय, तलवार, गोदावरी, बेतवा या युद्धनौका आणि काही पाणबुड्यांवरसुद्धा जायला मिळाले होते. परंतु मी ज्या जहाजावर पाऊल ठेवलं होतं ते त्या सर्वांपेक्षा प्रचंड मोठे होते. सुमारे १८३ मीटर लांब आणि ४५ मीटर रुंद. अकोमोडेशन तर जवळपास सहा मजली बिल्डींग एवढं मोठं होतं. जहाजावर पहिली रात्र हॉस्पिटल रूम मध्ये काढल्यावर दुसऱ्या दिवशी स्वतंत्र खोली मिळाली.

बार्करेनाला डिस्चार्जिंग पूर्ण करून जहाज अमेझॉन नदीमध्ये पुढील ३ दिवस सतत पुढे पुढे जात होते. समुद्र संपून खाडी कधी लागते आणि खाडी संपून अमेझॉन नदी कधी लागते, ते कळायला कोणताच मार्ग नव्हता कारण आजवर अमेझॉन नदी पुस्तकात वाचून जगातील सगळ्यात मोठी नदी आहे एवढंच माहित होतं. माझे जहाज पाण्याखाली १० ते ११ मीटर म्हणजेच सुमारे ३० ते ३५ फुट खोल असते. ॲमेझॉन नदीचे पात्र आणि त्यातील पाण्याची खोली समुद्रापासून १८०० किलोमीटर आत गेले तरी पाण्याची खोली ३५ फुटांपेक्षा जास्त आणि आजवर एवढं प्रगत तंत्रज्ञान असून सुद्धा एकसुद्धा पूल न बांधण्याएवढं रुंद आहे. मनौस या शहरापर्यंत सुमारे १८०० किलोमीटरचे नदीपात्र तर मी स्वतः पाहिले आहेत त्याच्यापुढे देखील काही जहाजे जाताना दिसायची.

अमेझॉन नदी आणि तिच्या खोर्यातील निसर्गसौंदर्य आयुष्यातील पहिल्याच जहाजावरील पहिल्याच सफरीत आणि पहिल्याच विमानप्रवासासह पहिल्याच परदेशवारीत पाहायला आणि अनुभवायला मिळाले.

मनौस शहरात गेल्यावर जहाजाला खूप दिवस ॲकर मिळायचा म्हणजे जहाजातील कार्गोसाठी किनार्यातील टाक्यांमध्ये जागा नसल्याने नांगर टाकून थांबवले जायचे.

असाच मोठा ॲकर मिळाल्यामुळे एका दिवसासाठी आमच्या चीफ इंजिनियरने ॲमेझॉन रिव्हर सफारी अरेंज केली. ज्यामध्ये एका लहानशा स्पीड बोटीत ॲमेझॉनचे जंगल आणि त्याच्या खोर्यात राहणाऱ्या लोकांचे व प्राण्यांचे

नवी संहिता... नवा आशय...





- **चिकन सूप फॉर द सोल ऑल इन द फॅमिली**
- **चिकन सूप फॉर द सोल ऑल इन द फॅमिली - भाग २**

आपल्या मोडकळीस आलेल्या
गंमतशीर, विचित्र व प्रेमळ कुटुंबांबद्दलच्या
विलक्षण कथा

जॅक कॅनफिल्ड /मार्क व्हिक्टर हॅन्सन /
ॲमी न्यूमार्क /सुसान एम हेम

अनुवाद

सुनीता कट्टी

किंमत प्रत्येकी २८०रु. । पोस्टेज अतिरिक्त

राहणीमान दाखवले जाते. एका छोट्याश्या बोटीत तिथला एक गाईड नदीच्या पात्रात असणारे प्राणी मोठं मोठे वृक्ष दाखवत नेत होता. मनौस शहर हे रिओ निग्रो आणि ॲमेझॉन नदी यांच्या संगमावर आहे. निग्रो नदीचे पाणी नावाप्रमाणेच काळ कुट्ट दिसतं तर ॲमेझॉन नदीचे पाणी पावसाला असेल तर गढूळ अन्यथा नितळ दिसतं. दोन्ही नद्यांचे पाणी एकमेकांत मिसळायला खूप वेळ जातो. पुढील कित्येक किलोमीटर दोन नद्यांच्या पाण्यातील रंगांची रेष दिसत राहते. दुसरं एक म्हणजे दोन नद्यांच्या पाण्यातील तापमानात सुमारे १० अंश सेल्सियसचा फरक असतो समजा दोन नद्यांच्या न मिसळणाऱ्या पाण्यातील रेषेवर बोट बरोबर मध्यभागी उभी केली तर उजव्या बाजूला असणाऱ्या 'रिओ निग्रो'चे पाणी हाताला कोमट लागतं आणि तेच डाव्या बाजूला असणाऱ्या अमेओनचे पाणी थंडगार लागतं.

मोठमोठाल्या मगरी आणि सुसरींचे पिंजरे बनवले गेलेत ज्यामुळे पर्यटकांना कधीही विशाल मगरी आणि सुसरी बघायला मिळतात. माणसाला फाडून खाणारे पिरान्हा माश्यांबद्दल पहिल्यांदाच ऐकलं आणि पाहिलं त्यामुळे ॲमेझॉन नदीत चुकूनसुद्धा पडायला नको असं मत तयार झालं. नदीतून पुढे जात असताना एका लहान मुलाने काहीतरी इशारा केला त्याला इंग्रजी येत नव्हते. गाईड सोबत त्याने पोर्तुगीज भाषेत काहीतरी बोलणं केलं आणि गाईड आम्हाला म्हणाला त्याच्याकडे एक पाळीव प्राणी आहे पैसे घेऊन तो तुम्हाला त्या प्राण्यासोबत फोटो काढायला देईल. आम्ही तयार झाल्यावर त्या लहान मुलाने एक भला मोठा जिवंत अजगर बाहेर काढला. गाईडने सांगितले हा आहे ॲमेझॉनमधील बेबी ॲनाकांडो. त्या ॲनाकोंडाला आम्ही गळ्यात घालून फोटो वगैरे काढले पण नंतर राहून राहून एकच विचार येत होता की, ॲनाकोंडा हा काही पाळण्यासारखा प्राणी आहे का?

ॲमेझॉनचे वर्षावन पाहता पाण्यात अनेक खांबांवर उभी असलेली घरे पाहिली, त्यात कुटुंबं राहत होती. नंतर एका ठिकाणी तरंगणाऱ्या लाकडी खोल्या दिसल्या जसजशी बोट जवळ गेली तर त्या खोल्यांमध्ये लहान लहान मुलं दिसू लागली. आम्हाला आत जाऊ दिले. आत त्या खोल्यांमध्ये शाळा भरली होती. तीच होती फ्लोटिंग स्कूल. पूर्णपणे पाण्यावर तरंगणारी शाळा. काही वेळातच शाळा सुटली आणि त्या शाळेत आलेली लहान लहान मुले त्यांना घ्यायला आलेल्या पालकांसोबत ऐटीत बोटमध्ये बसून आपापल्या घरी

जाताना दिसत होती.

आज सुमारे दहा वर्षांनंतर सुद्धा ब्राझील सफारीवरील ॲमेझॉन नदीची विशालता तिचे अप्रतिम निसर्ग सौंदर्य आणि सृष्टी आजही डोळ्यांसमोर जशीच्या तशी उभी राहते. ऑब्रिगडो म्हणजे धन्यवाद आणि अमिगो म्हणजे मित्र हे दोन पोर्तुगीज शब्द पण कायम लक्षात राहिलेत.

– प्रथम रामदास म्हात्रे

'प्रयोग' शाळा

हल्लीची मुल वाचत नाहीत. त्यांना शिक्षणाची गोडी नाही. त्यांना पुस्तकांचा कंटाळा येतो, असे आपण म्हणतो; पण असे होऊ नये यासाठी काय करतो? मनीषा उगले ही तरुण शिक्षिका मात्र यासाठी नक्कीच प्रयत्न करते आहे. तिच्या प्रयत्नाने जिल्हा परिषद शाळा, गुळवंच इथल्या विद्यार्थ्यांना पुस्तकांची, भाषेची गोडी लागली आहे.

एखादी भाषा शिकवणे म्हणजे केवळ त्या भाषेचे त्या इयत्तेसाठी ठरवून दिलेले पाठ्यपुस्तक शिकवणे नव्हे. भाषेचे विविध पदर, सौंदर्य लक्षात घेत तिची गोडी लागणे, हेच खरे तर मराठीच्या अभ्यासामागचे महत्त्व; पण अनेक शाळांमध्ये नेमके तेच हरवलेले दिसते. मग मराठी हा फक्त 'कमी गुण देणारा विषय' बनून जातो. मनीषा उगले या तरुण शिक्षिकेला मात्र भाषेची हेळसांड बघवत नव्हती. तिने ठरवले, आपण आपल्यापरीने जेवढे करू शकतो तेवढे करायचे. त्यासाठी तिच्यासोबत होती, जिल्हा परिषद शाळा गुळवंच इथली बालसेना. मनीषाच्या या शाळेत पहिली ते चौथीचे वर्ग भरतात. आपल्याला आपली भाषा जितकी गोड वाटते, तितकीच विद्यार्थ्यांना वाटायला हवी, या भावनेतून मनीषाने वेगवेगळे उपक्रम राबवायला सुरुवात केली.

सर्वात पहिली अडचण होती ती भाषेचीच. ग्रामीण भागातल्या मुलांची बोलण्याची भाषा आणि लिहिण्याची भाषा वेगवेगळी असते. त्यामुळे त्यांना प्रमाण भाषेतून शिकताना, लिहिताना अडचणी येतात. खरे तर त्यांना प्रमाणभाषेची भीतीच वाटते; पण मनीषाने असे बोलीभाषेतले शब्द मराठीच्या तासाला एकत्र

केले. आपल्या रोजच्या जगण्यातले, आपल्याला माहिती असलेले शब्द आपल्या बाईंनाही माहिती नाहीत, याची विद्यार्थ्यांना भारी गंमत वाटली आणि त्यांची भीती हळूहळू दूर होऊ लागली. भाषेतील शब्द, गाणी, म्हणी, उखाणे आणि वाक्प्रचार यामुळे भाषेचे सौंदर्य वाढते. विद्यार्थ्यांना त्याची ओळख करून देण्यासाठी मनीषा सतत प्रयत्नशील असते.

अनेक चांगली पुस्तके, त्यातील उतारे, कथा, कविता ती मुद्दामहून वर्गात वाचून दाखवत असते. या साहित्यामध्ये केवळ शहरी साहित्य नसते, तर ग्रामीण साहित्यही असते. आपल्या जगण्यातले शब्द पुस्तकात पाहून विद्यार्थ्यांना आपल्या बोलीबद्दल गोडी वाटते. त्यांचा संकोच दूर होतो. विद्यार्थी अनेक बडबडगीते, बालगीते म्हणतात. काही पुस्तकातली असतात, तर काही घरीच कुणी तरी शिकवलेली. गावाप्रमाणे, जिल्ह्याप्रमाणे बालगीते, त्यांची भाषा बदलत जाते. यातली अनेक गीते कुठेच लिहिलेली नसतात. ती काळाच्या ओघात नष्ट होऊ नये म्हणून मनीषाने दुसरीतल्या विद्यार्थ्यांसोबत प्रकल्प राबवला. त्यामध्ये मुलांचे काही गट तयार केले. गटातील प्रत्येकाला आपल्या ओळखीच्या प्रत्येकाकडून अशी बालगीते जमवायला सांगितली. आठवड्याच्या कालावधीत त्यांनी बरीच गाणी जमवली. या गाण्यांचा 'कट्टीकट्टी बालबट्टी' नावाचा पीडीएफ संग्रह मनीषाच्या विद्यार्थ्यांनी तिच्या सहाय्याने बनवला. आता या संग्रहानंतर मनीषाला गावकुसातील गाणी, पारंपरिक गीतांचाही संग्रह करायचा आहे.

सध्या मनीषा राबवत असलेला उपक्रम आहे-अभिवाचनाचा. बरेचदा

विद्यार्थी अतिशय रटाळ पद्धतीने वाचन करतात, कारण 'वाचावे कसे' याचे प्रत्यक्ष उदाहरण त्यांना कोणी दाखवलेले नसते. मग मनीषाने मुलांच्या वयोगटाला अनुरूप अशा अनेक दर्जेदार कथा, ललितनिबंध आणि नाट्यछटा यांचे अभिवाचन सहकाऱ्यांच्या मदतीने वर्गात करून दाखवले. अभिवाचन आणि एकसुरी यांत्रिक वाचन यांच्यातील फरक मुलांना दाखवून दिल्यामुळे त्यांना वाक्यातील स्वराघातांचे महत्त्व समजले. विरामचिन्हांची गरज लक्षात आली. भाषेतील सौंदर्यपूर्ण शब्द, प्रतिमा यांकडे मुलांचं आवर्जून लक्ष वेधले गेले. या सगळ्यातून कळत नकळत भाषेची ओढच विद्यार्थ्यांना लागली. एरवी आपण जे बोलतो, लिहितो ते आणखी सुंदर शब्दांत व्यक्त करता येऊ शकतं हे यानिमित्ताने विद्यार्थ्यांना समजले. 'वाचू आनंदे' या संपादित पुस्तकाचा त्यांना खूप फायदा झाला. त्याचसोबत स्मिता पाटील यांच्या 'स्मिताताईच्या गोष्टी' या ऑडिओ मालिकेतील गोष्टी विद्यार्थ्यांना त्यांनी वर्गात ऐकवल्या आणि त्या त्यांना फारच आवडल्या. या सर्व प्रयत्नांतून 'चांगला कान' तयार झालेल्या मुलांच्या वाचण्याच्या पद्धतीत आता लक्षणीय बदल दिसून येतो आहे. विरामचिन्हे, स्वराघात यांचा विचार करून मुलं सुश्राव्य वाचन करू लागली आहेत.

मराठीच्या पेपरमध्ये कमी गुण मिळण्याचे कारण म्हणजे निबंध आणि पत्रलेखनासारखे प्रश्न. कधीही व्यक्त होण्याची सवय नसेल तर विद्यार्थी इथे कमी पडतात. म्हणूनच मनीषाने अगदी दुसरीतल्या विद्यार्थ्यांसोबत पत्रलेखनाचा प्रयोग सुरू केला. सुरुवातीला विद्यार्थ्यांनी एकमेकांना पत्रे लिहिली. पालकांना,

शिक्षकांना अनौपचारिक पत्रे लिहिली. त्यानंतर हळूहळू त्यांना पत्रलेखनाचे कारण उमजले. त्यातील वाक्यरचना, शब्दयोजना याविषयी आपोआपच विद्यार्थी सजग होऊ लागले. शिवाय आपल्या भावना शब्दात उतरवण्याच्या या सरावामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वासही वाढीला लागला. मनीषाला तिच्या कामात ॲक्टिव्ह टीचर्स फोरमसारख्या गटाची खूपच मदत झाली. त्यांचा आणि वर्षा सहस्रबुद्धे यांचा ती विशेष उल्लेख करते. या उत्तम मार्गदर्शनामुळेच तिला निरनिराळे उपक्रम राबवण्याची प्रेरणा तिला मिळाली.

तिच्या या कष्टाचे फळ हळूहळू दिसत आहे. नुकतेच तिच्या चौथीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी स्वत:साठी दिवाळीची खरेदी म्हणून पुस्तके घेतली. तेही आपल्या खाऊ, खेळण्यांचे आणि कपडयांचे पैसे वाचवून. एका भाषाप्रेमी शिक्षकाला याहून अधिक चांगली भेट काय असेल!

– संकलन : स्वाती केतकर-पंडित

◆

नवी संहिता... नवा आशय...



- **चिकन सूप फॉर द सोल माय रेझोल्यूशन**
- **चिकन सूप फॉर द सोल माय रेझोल्यूशन -भाग २**

या पुस्तकातील गोष्टी तुम्हाला विचार करण्यास प्रवृत्त करतील, तुम्हाला हसवतील, रडवतील आणि तुमच्या मनाला स्पर्शही करतील,

---

जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन
डिएट्टे करोना / बार्बरा लोमोनाको

अनुवाद

वैशाली रानडे

किंमत प्रत्येकी २५०रु. । पोस्टेज अतिरिक्त



‘तथागत गोतम बुद्ध’

कर्तव्यदक्ष माजी शिक्षणाधिकारी, साहित्य आणि समाजाचे डोळस अभ्यासक वसंत गायकवाड यांनी अपार मेहनत घेऊन साकारलेली ‘तथागत गोतम बुद्ध’ ही भगवान गोतम बुद्धांच्या जीवनावर आधारित अशी चरितकहाणी आहे.

कादंबरीच्या परिभाषेत ती एक महाकादंबरी आहे. आपल्याकडे महाकाव्याचे प्राचीन साहित्यापासून काही एक निश्चित असे निकष तयार करण्यात आलेले आहेत; पण तसे कादंबरीचे निश्चित विशिष्ट असे निकष झालेले असले तरी महाकादंबरीचे निकष मात्र निश्चित झाले असल्याचे दिसत नाहीत. कदाचित याची कारणे अशा वाङ्मय प्रकारांशी संलग्न झालेली असतील असे वाटते. म्हणजे असे की, कादंबरी पृष्ठसंख्येने वाढली की, ती पसरट होण्याची भीती असते. तशी ती पसरट झाली की, आपला प्रभाव गमावून बसण्याची दाट शक्यता असते. श्री. ना. पेंडसे यांच्या ‘तुंबाडचे खोत’ या कादंबरीच्या बाबतीत असाच काहीसा अनुभव आलेला आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या ‘हिंदू...’ या कादंबरीबद्दल म्हणजे केवळ बहुचर्चित कादंबरी नव्हे तर ज्ञानपीठ पारितोषिक प्राप्त कादंबरीबद्दल पण जाणत्या वाचकांनी असाच काहीसा अभिप्राय नोंदविलेला आहे. या पार्श्वभूमीवर आपण जेव्हा ‘तथागत गोतम बुद्ध’ या महागद्य लेखनाकडे वळू तेव्हा हा पूर्वानुभव लक्षात घेणे तसे स्वाभाविक आहे. त्यातून वसंत गायकवाड यांनी

साहित्याच्या काहीशा जिकिरीच्या काळात हे साहित्यिक साहस केलेलं आहे, हेही आपण नजरेआड करू शकत नाही.



'तथागत' याचा शब्दकोशातील अर्थ 'जसा आहे तसा' असा आहे. याचा अर्थ 'भगवान बुद्ध जसे होते तसेच त्या काळापासून ते थेट आजच्या काळापर्यंत समाजाच्या भूपृष्ठावर आहेत' असाच याचा अर्थ आहे आणि वसंतराव गायकवाड यांचे प्रदीर्घ लेखन आपल्या मनातील या महापुरुषाची ही प्रतिमा अबाधित ठेवण्याकरिता पूरक झालेले आहे, हे नोंदवताना समाधान होत आहे.

भगवान बुद्ध यांचा काळ मानला तर जवळपास तसा प्राचीनतम आहे. त्या काळातील गुंतागुंतीचे नातेसंबंध, तत्कालीन राज्यव्यवहार, समाजव्यवस्था, काळाची गणती आणि गती, एकूण वातावरणाचे भान, नित्य आणि नैमित्तिक व्यवहार, आहारविहार पद्धती अशा एक ना अनेक बाबी गुंतलेल्या आहेत; पण संवादाची कालिक भाषा कोणती? वर्णनशैलीचे काय, असे आणखी काही प्रश्न पण लेखक म्हणून वसंत गायकवाड यांना निश्चितच जाणवले असणार. त्या कालातील पाली भाषेला आज कोणता पर्याय मान्य होईल याचा पण अचूक अंदाज लेखकाच्या ठायी अपेक्षित आहे. प्राकृत मराठीचा वापर अजमावून पाहावा तर ती संस्कृतीला पण तितकीच जवळची आहे. आजच्या मराठीपेक्षा अर्वाचीन कालीन मराठी अधिक जवळची वाटावी अशी परिस्थिती. यातून ग्रंथकारांना आणि ग्रंथांना वाट पुसत वसंत गायकवाड आपले समर्पक पर्यावरण निर्माण करत करत पुढे जातात असे दिसते. त्यातच त्यांचा कालानुरूप भाषा सजविण्याचा यथार्थ असा प्रयत्न दिसून येतो आणि तो निश्चितच मोलाचा आहे; कारण त्यात ते यशस्वी झालेले आहेत असे म्हणता येते. काही काही ठिकाणी चुका खटकतात, जाणवतात; पण त्या एवढ्या मोठ्या व्यापक पसाऱ्यात अत्यंत गौण आणि प्रसंगी लक्षातसुद्धा येत नाहीत एवढ्या किरकोळ वाटून जातात. त्यापेक्षा एकूण मांडलेला लेखनाचा मांड उजवा वाटत जातो, हेच महत्त्वाचे आहे असे वाटते.

आपण जेव्हा वर्तमानकाळातून प्राचीन काळाकडे पाहू लागतो, तेव्हा आपणाकडे काळाच्या सार्थ शोधाची वेगळीच क्षमता असावी लागते. ती श्री. वसंत गायकवाड यांच्या ठायी असल्याचे जाणवते. व्यक्तिश: मला ही एक अत्यंत चैतन्यस्पर्शी चरितकहाणी वाटते. ती विस्ताराने पुढे आलेली आहे, म्हणून आपण तिला गाथा म्हणावयाला हरकत नाही. ही महाकादंबरी तशी भगवान बुद्ध या महानायकाच्या जीवनाचा शोध घेण्याचा परोपरीने प्रयत्न करते आहे. तसाच ती गोतम बुद्धांच्या तत्त्वांचा पण परोपरीने शोध घेण्याचा प्रयत्न करते आहे. त्या अर्थाने ही या लेखकाची एक दुहेरी अशी शोधयात्रा आहे. त्याकरिता त्यांनी आयुष्यातील काही वर्षे वेचलेली आहेत. तत्कालीन काळाचा चिकित्सक असा धांडोळा घेण्याचा अंत:करणापासून प्रयत्न केलेला आहे. याबाबत त्यांनी अंगीकारलेले लेखनव्रत आपणास इथे पानोपानी आढळून येईल. भाषेच्या जरतारी वस्त्राचे पण त्याच्या बरोबरीने वेधक असे दर्शन घडेल. घडून गेलेल्या चरिताचा अन्वयार्थ लावण्याची लेखकाची कुवत लक्षणीय वाटावी अशीच आहे. या साऱ्यातून 'तथागत गोतम बुद्ध' ही महाकादंबरी ठरली आहे.

खरेतर हे आव्हान सामान्य नव्हते, तर केवळ असाधारण असेच होते. तरीपण वसंत गायकवाड यांच्या जीवन आणि साहित्यविषयक प्रगाढ चिंतनातून साकारलेली ही साहित्यकृती तमाम समीक्षकांना आणि गोतम बुद्धांच्या अभ्यासकांना पण तितकीच प्रेरणादायी वाटेल, याबद्दल माझ्या मनात संदेह नाही. श्रीयुत गायकवाड यांची ही लेखनसिद्धी आपणा सर्वांनाच तथागतांचा मार्ग अनुसरण्याकरिता तितकीच उपकारक ठरेल, असा मला मनोमन विश्वास वाटतो आहे. वसंत गायकवाड यांची 'तथागत गोतम बुद्ध' ही महत्त्वाकांक्षी साहित्यकृती चिरंतनाच्या वाटेवरील पथदर्शक ठरेल अशी अपेक्षा. अपूर्व अभिनंदन!

– प्रा. वैजनाथ महाजन

(ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक)

'गूढ, उत्कंठावर्धक तपासाची कहाणी'

क्रिमिनल्स इन युनिफॉर्म

एखादा गुन्हा घडतो तेव्हा त्याच्या गुन्हेगारांपर्यंत पोहोचण्याची कहाणी अनेकदा मालिकांमध्ये, चित्रपटांमध्ये पाहिली असेल. 'सीआययु'मध्येही गुन्हेगारापर्यंत पोहोचण्याचा प्रवास अत्यंत रंजक आणि उत्कंठावर्धक पद्धतीने मांडण्यात आला आहे. या पुस्तकाच्या नावातच घडलेल्या गुन्ह्याविषयी उत्सुकता निर्माण होते. या पुस्तकाची संकल्पना प्रत्यक्षात घडलेल्या अँटिलिया बाहेरील स्फोटकांच्या गाडी प्रकरणाशी निगडीत आहे. साहाजिकच गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी ज्या यंत्रणा आणि त्यातील लोक कामाला लावले जातात त्या सर्वांचाच या कथामांडणीत प्रभावी वावर दिसून येतो.

'सीआययु'ची सुरूवातच मोठी रंजकपणे आत्ताच्या किंचाळत ब्रेकिंग न्यूज सांगणाऱ्या वृत्तवाहिनीने सांगितलेल्या एका घटनाक्रमाने होते. तेव्हा इमारतीबाहेर तपास यंत्रणा येऊन थांबलेल्या असतात. हा घटनाक्रम मुंबईच्या उच्चभ्रू वस्तीतल्या कुबेरिया या अब्जाधीश कुबेर यांच्या बहुमजली कुबेरिया इमारती बाहेर घडतो. तिथल्या श्रीमंतीचे वर्णनही अगदी डोळ्यासमोर उभे राहते. रॉ मध्ये सेवा बजावलेला अमन चौधरी हा कुबेरांचा सुरक्षा प्रमुख. इमारती बाहेरच्या गल्लीत लागणाऱ्या सर्वच गाड्यांची आणि सुरक्षिततेच्या तपासणीसाठी बाहेर पडलेल्या अमनला संशयास्पद गाडी आढळते कारण नंबर कुबेरांच्या ताफ्यातल्या गाडीचा असतो. मग सिलसिला सुरू होतो तो तपासयंत्रणांच्या तपासणीचा, वृत्तवाहिन्यांच्या निवेदनाचा आणि कटाच्या सुत्रधारांच्या हालचालीं, कारस्थानांचा.

सुरक्षा प्रमुखाने संशयास्पद गाडी पाहिल्यानंतर स्थानिक पोलिस पहिल्यांदा पोहोचल्यानंतर क्राईम इन्व्हेस्टिगेशन युनिट गावदेवी पोलिसांच्या पाठोपाठ घटनास्थळी अवतरते. त्यानंतर एटीएस, बॉम्बशोधक पथक, सेंट्रल पोलिस फोर्सचे अधिकारी आणि क्राईम इन्व्हेस्टिगेशन युनिटही पोहोचते.

हे सर्व वर्णन अत्यंत चित्रमय आणि प्रत्ययकारी पद्धतीने लेखकाने केले आहे, प्रत्यक्ष घटनेवर आधारित आणि ताज्या घडामोडींचा संदर्भ असल्याने वाचतानाही हे प्रसंग अगदी थेटपणे डोळ्यासमोर उभे राहतात. संशयास्पद गाडीमध्ये सापडले ते फक्त जिलेटीन. स्फोटासाठी डिटोनेटर आवश्यक असते



ते त्यात नसते. त्यामुळे आशियातील श्रीमंत असलेल्या कुबेरांना मारण्याचा डाव रचलेला असतो आणि त्याचा इशारा देणारी ही कृती होती असे प्रथमदर्शनी वाचकाला वाटत असतानाच वाचकाला पुढे गेल्यानंतर राज्यसरकार, पोलिस, विविध तपास यंत्रणांच्या सहभागामुळे नेमके काय गूढ असेल याची उत्सुकता दर प्रकरणामध्ये ताणली जाते.

या प्रकरणी स्थानिक, राज्य, राष्ट्रीय किंवा गुप्तचर पातळीवरच्या यंत्रणांची आपासातली दुही, हेवेदावे, चढाओढही उत्तम पद्धतीने मांडत अखेर पोलिस आयुक्तांच्या आग्रहाने सीआययूकडे तपास येतो. यतीन साठे हा एक वादग्रस्त पोलिस अधिकारी असतो. या पोलिसाचा भूत-वर्तमानकाळ माहित असणारा एक प्रमुख माध्यम प्रतिनिधी संपूर्ण कथानकात या घटनेचे चित्रण, टिपण करत असतो. यात संजय त्रिवेदीची व्यक्तिरेखा लेखकाने उत्तम चित्रित केली आहे.

त्यानंतर या प्रकरणात पोलिसांचा सहभाग असावा हा विचार प्रामुख्याने येऊ लागतो आणि पोलिसांनी गाडीचे इंजिन आणि त्याचा चेसिस क्रमांक काढून टाकणे या गोष्टी केल्याने पोलिसांचा हेतू आणि त्यांचा सहभाग याबद्दल फार काही शंका राहात नाही. मात्र त्यांना अडचणीचे ठरतात ते एटीएस डीआयजी पलांडे, कारण सर्व गोष्टींचे पुरावे नष्ट केल्याचा पोलिसांना आनंद ते हिरावून घेतात ते काचेवरील फायनान्सरचा पत्ता, नंबर मिळवून. त्यानंतर कट रचलेल्या पोलिस विभागाची खरी तारांबळ सुरू होते एटीएस निर्णायक तपास करत असताना कारचा मालक हा तपासाधिकारी असलेल्या पोलिसाचा जानी दोस्त असतो हसमुख/मनसुख. जो पट्टीचा पोहणारा असूनही त्याचा पुढे पाण्यात बुडून मृत्यू होतो. त्याच्या मृत्युपश्चात अहवालात अनेक गोष्टी उघड होतात. पुढेपुढे साठेला आपण वरिष्ठांच्या या खेळात आपण प्यादे असल्याचे लक्षात येते. इथे पुढे काय घडणार याची उत्सुकता कायम ठेवण्यात लेखकाला त्याच्या लेखन शैलीमुळे नक्कीच यश मिळाले आहे. कोणत्याही एकाची बाजू न घेता, कथानक रंगत गेले आहे.

सरकारची बाजू, विरोधकांची बाजू, या गोष्टीही अधूनमधून ठळकपणे वर्णन केल्या आहेत. तपासाधिकाऱ्याचे सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांशी असलेले संबंधांवरून विधानसभेत गोंधळ वगैरे प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनाही या कथेत वाचायला मिळतात. राजकीय पक्ष, तपास यंत्रणा यांच्यातील लुटुपुटीच्या लढाईचे उत्तम शब्दचित्र लेखकाने रेखाटले आहे. त्यानंतर तपास यंत्रणांमध्ये बदल, तपास अधिकाऱ्याची बदली या सर्व उत्कंठावर्धक वेगवान चित्रणातून उत्सुकता ताणली जाते.

एनआयच्या जाळ्यात अलगद सापडणारा तपासाधिकारी फाजील आत्मविश्वासापायी कशा चुका करतो त्याचे यथास्थित वर्णन करत कथा पुढे सरकते. त्यानंतर एनआयए आणि महाराष्ट्र एटीएसच्या तपासातून मुंबई पोलिसांच्या सर्वोच्च पदावरील अधिकाऱ्याची या प्रकरणातील गुंतवणूक समोर आल्यानंतर त्याची बदली, त्यानंतर अधिकाऱ्याचा लेटरबॉम्ब, त्यातून सरकारमधील नेत्यांवरील आगपाखड, गृहमंत्र्यांवर वसुलीचे आरोप करून वेगळीच खळबळ माजवली जाते हा सारा नाट्यमय भाग चालू घडामोडींशी नाते सांगतो.

हे सर्व घटनाक्रम गेल्या काही महिन्यांपुर्वी राज्यात घडलेल्या मोठ्या हायप्रोफाईल प्रकरणासमान असल्याने या प्रकरणी नेमके कोण सूत्रधारकोण याची उत्सुकता क्षणोक्षणी ताणली जाते. ही कथा वाचताना सातत्याने आपण प्रत्यक्षात घडलेल्या घटनांना त्यात जोडू पाहातो. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे माध्यमांतील संजय त्रिवेदी हा प्रतिनिधी या सर्व कथानकाच्या शेवटाला पडदा पाडतो, ते कसे हे निश्चित रंजक आहे.

ही कादंबरी वेगवान झाल्याने उत्सुकता ताणून ठेवतेच शिवाय ती वाचून काढल्याशिवाय हातावेगळी करू नये असेच वाटते. प्रसंग रंगवण्याची लेखकाची हातोटी यात वाखाणण्यासारखीच आहे. वाचकाला गुंतवून ठेवण्यात ही कादंबरी नक्कीच यशस्वी होते आहे. त्याची भाषा ओघवती आहे आणि ही अनुवादित कादंबरी लोकांसमोर मराठीतून आल्यास तिला निश्चितपणे उत्तम प्रतिसाद मिळेल असे वाटते.

गोवा मला दिसलेला



लेखक नोकरीनिमित्त प्रदीर्घ काळ गोव्यात राहिल्यामुळे त्यांना आलेले अनुभव, स्थानिक संस्कृतीचे कुतूहल, त्यामागचा इतिहास जाणून घेण्याची इच्छा ह्यातून हे पुस्तक साकार झाले. त्यासाठीची माहिती गोळा केलेला अभ्यास दिसून येतो.

खुसखुशीत भाषा हलके फुलके विनोद पेरत माहिती सांगण्याची लेखकाची हातोटी आहे . ह्यामुळे लेख वाचायला मजा येते. पाव पुराण हे तिथल्या खाद्य संस्कृतीचे दर्शन घडवते तर गोव्यातले चर्च आणि घरांबद्दल माहिती द्यायला पोर्तुगीज वास्तुरचना ह्या लेखाची मदत होते

पर्यटकांसाठीचा गोवा आणि मूळ गोवा यातील फरक जाणवतो. अनेक संकल्पना बाहेरच्या माणसाला माहीत नसण्याची शक्यता आहे. गोव्या बाहेरच्या लोकांनी न पाहिलेला गोवा दाखवण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. आझुलेओ, जंबल सेल अश्या अनेक नवीन संकल्पना माहिती होतात. मारिओ मिरांडांची चित्रे हा सुद्धा फारसा परिचित नसलेला विषय. पण त्याबद्दलचे प्राथमिक कुतूहल शमवायला त्यावरचा लेख मदत करतो.

गोव्याच्या दैनंदिन रुटीन मधल्या गोष्टींबद्दलसुद्धा छान माहिती मिळते. लहान लहान लेखांद्वारे गोव्याचे अंतरंगाची झलक दाखवण्याचा लेखकाचा प्रयत्न मराठी वाचकांना नक्की आवडेल.

– निर्मिती कोलते

मेळघाटातील जंगलकथा...

सुट्ट्या सुरू झाल्या की मुलांना मामाच्या गावाला जायचे वेध लागतात

नवी संहिता... नवा आशय...

- **चिकन सूप फॉर द सोल शेपिंग द न्यू यू**
- **चिकन सूप फॉर द सोल शेपिंग द न्यू यू - भाग २**

आहारनियमन, आरोग्यवर्धन यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या आणि तुमच्यासाठी रामबाण ठरणारे उपाय कोणते याबद्दलचे मार्गदर्शन करणाऱ्या गोष्टी

जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सेन आणि **एमी न्यूमार्क**

प्रास्ताविक : रिचर्ड सिमॉन्स

अनुवाद

ॲड. शुभदा विद्वांस

किंमत प्रत्येकी ३२०रु. । पोस्टेज अतिरिक्त



आणि जर का तो मामा जंगलचा राजा असेल, त्याच्या अस्तित्वाचा दबदबा असेल, तर...? अशाच रुबाबदार मामाच्या गावाची सफर घडवणारं, थरारक, रोमांचकारी, भावनिक अनुभवांत चिंब भिजवणारं पुस्तक म्हणजे 'कुलामामाच्या देशात' हा कथासंग्रह. यात ज्येष्ठ वनाधिकारी रवींद्र वानखेडे यांच्या मेळघाटच्या जंगलातील अनुभवकथा जी. बी. देशमुख यांच्या खुमासदार शैलीत वाचायला मिळतात. एकूण २५ कथांचा हा संग्रह आहे. जंगल, तिथल्या प्राण्यांचे जीवन, आदिवासींचं जगणं, वनक्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचं जीवावर उदार होऊन कर्तव्य पार पाडणं या सगळ्याचा रोचक, थरारक, भावनिक अनुभव वाचकांना या कथांतून येतो. प्रत्यक्ष वनाधिकाऱ्याने कथन केलेल्या वास्तव अनुभवांबद्दल विलक्षण वाचकांनाही साहजिकपणे उत्सुकता असते.

कोरकू आदिवासींच्या कुलामामा म्हणजे वाघोबा. मेळघाटाच्या जंगलातला हा रुबाबदार कुलामामा काळजात धडकी भरवत असला तरी त्याच्या दर्शनाची उत्कंठा तिथले कर्मचारी, अधिकारी आणि पर्यटकांनाही लागलेली असते. कधी कुलामामाला पाहण्यासाठी, कधी संकटात सापडलेल्या कुलामामाची सुखरूप सुटका करण्यासाठी, तर कधी त्याचा माग ठेवण्यासाठी केले जाणारे प्रयास 'डरकाळीचा थरार', 'जीवाची पर्वा', 'अज्ञात पाहुणा' यांसारख्या कथांतून वाचायला मिळतात.

जंगलात राहणाऱ्या प्राण्यांचे स्वत:चे एक तत्त्वज्ञान असते. तिथे 'सर्व्हायव्हल ऑफ दी फिटेस्ट' हा एकच नियम असतो. दया-मायेच्या भावनेपेक्षा स्वअस्तित्वाचे भान सगळ्यात टोकदार असते. हे तत्त्वज्ञान 'जीवाचा आकांत', 'मेळघाटचे दारासिंग आणि किंगकाँग', 'जगण्याची उमेद' या कथांतून प्रत्ययाला येते. हत्ती आणि माहूत यांचं नातं सहसा जिव्हाळ्याचं असतं. रागाच्या भरात भोला हत्तीने केलेली माहूताची हत्या व त्यानंतरचा त्याचा पश्चात्ताप, आक्रोश, माहूताप्रति असणारं प्रेम व त्यासाठी त्याने केलेला स्वअंत याचं हृदयद्रावक वर्णन 'खूश रहना मेरे यार' व 'महाकाय आकांत' या कथांमध्ये वाचून

आपलेही डोळे पाझरतात.

जे लोक बेशिस्त असतात त्यांना 'जगली' म्हटलं जातं. पण जंगलातल्या प्राण्यांना शिस्त असते. ते वेळप्रसंगी संयम, जबाबदारीचं भान कसं दाखवतात ते 'रानगव्यांची कवायत' कथेत वाचायला मिळतं. आपल्याला असं वाटत असतं की वाघ उष्टी शिकार खात नाही. पण वेळ आली तर वाघीण आपल्या पिलांचे पोट भरण्यासाठी अर्धवट खाल्लेली शिकार खाऊन वेळ कशी मारून नेते ते 'आणि वाघीण खानदान की इज्जत विसरली!' या कथेत वाचायला मिळतं.

मेळघाटात आदिवासी अवैध शिकार आणि मासेमारी करत असतात. रोगोर, एंडोसल्फॉनसारखी कीटकनाशकं टाकून किंवा डायनामाइट वापरून अवैध मासेमारी केली जाते. कीटकनाशकांमुळे क्विंटलच्या वजनाएवढे मासे मरून पडतात. असे मासे खाल्ल्याने माणसांना विविध आजार होतात. डायनामाइटचा स्फोट घडवताना बऱ्याच वेळा आदिवासींची बोटे तुटतात, हाताच्या चिंध्या होतात. जंगलात घडणाऱ्या अशा अवैध गोष्टी 'एक थरारपट', 'अवैध मासेमारी', 'वैराटची जंगलकथा' या कथांमधून वाचायला मिळतात. 'हिरूबाई भाग गयी', मेहमान रह गया' या कथाही आपल्याला अंतर्मुख करतात.

प्रत्येक प्राणी आपल्या ताकदीनुसार सावज हेरून शिकार करतो. गाय, म्हैस, बैल, रानगवा यांसारख्या वजनदार प्राण्यांची शिकार वाघ करतो. पहिली शिकार खाऊन संपल्यावरच तो दुसरी शिकार करतो. माणसासारखं तो अन्न साठवून ठेवत नाही. रानकुत्रे टोळीने सावजाचा पाठलाग करून, दमवून त्याचे लचके तोडतात. तर बिबट्या सांबर, चितळ, भेकर अशा छोट्या सावजांना लक्ष्य करतो. अस्वल, रानगवे, रानटी कुत्रे, सांबर यांची जगण्याची पद्धत, शत्रूशी लढण्याची कला आदी माहिती या कथांमधून मिळते. कथेची भाषा साधी, सोपी व प्रवाही आहे. प्रत्यक्ष जंगलातले अनुभव कथेच्या रूपात मांडलेले असूनही त्यांत कुठेही रटाळपणा जाणवत नाही. मेळघाटातले हिरवेगार दाट जंगल आणि त्यातला रुबाबदार कुलामामा अन्वर हुसेन यांनी अतिशय सुंदररीत्या मुखपृष्ठावर चितारला आहे. हुसेन यांनी प्रत्येक कथेचा आशय समर्पक चित्रांतून मांडल्यामुळे कथा वाचकांच्या काळजास भिडतात. असा हा मेळघाटातल्या जंगलाचा सचित्र रोमांचकारी अनुभव देणारा, 'वन है

तो धन है, तो जन है' असं शेवटी सांगणारा हा कथासंग्रह नक्कीच वाचनीय आहे.

– मंगल कातकर

दैनिक लोकसत्ता (लोकरंग) १२ जून २०२२

'प्लँटोन' - विज्ञानातून गैरव्यवहाराला आव्हान!

एकाच कादंबरीत दोन स्वतंत्र कथानकं - एक सामाजिक परिस्थितीवर अचूक भाष्य करणारं, तर दुसरं विज्ञानजगताचा सारिपाट नेमक्या पद्धतीने मांडणारं! विशेष म्हणजे, ही दोन्ही कथानक समांतर असली तरी, परस्परांमध्ये आत्मीय सहसंबंध पाहायला मिळतो आणि त्यामुळेच वैज्ञानिक संकल्पनांपासून कोसो दूर असलेल्या वाचकालाही 'प्लँटोन' कादंबरी कवेत घेते. या कादंबरीत साहस, सामाजिक वास्तव, राजकीय कुरघोड्या, ध्येयवेडी माणसं, प्रेमाचा हळुवार स्पर्श, समर्पित जीवन, सर्वसामान्यांतला नायक आणि त्याहूनही सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, वैज्ञानिक समुदायाची कार्यपद्धती आणि विज्ञानाचा अद्‌भुत आविष्कार असं सारं काही येतं.

वाचकाला याच सुरुवातीच्या घडामोडींतून कादंबरीच्या उत्कटतेची ओढ लागते. सोनवणेंच्या कर्तव्यदक्ष कारकीर्दीचा लेखाजोखाच आपल्याला प्रशासकीय व्यवस्थेतील जळजळीत वास्तव समोर ठेवतो. निसर्गसंपन्न रामपूर परिक्षेत्रात बदली होऊन आलेले सोनवणे, त्यांचे सहकारी जाधवकाका, साहाय्यक वनपाल निशिकांत ठाकरे, वाहनचालक नटवरसिंग या वनविभागातील प्राथमिक लोकांचे प्रयत्न दर्शवतात आणि त्यांच्याभोवती फिरणारं कथानक सर्वच भ्रष्ट यंत्रणांचा बीभत्स चेहरा समोर आणतं. विज्ञान कथानकाचा प्रमुख नायक सोनवणेंचा घनिष्ठ मित्र डॉ. समीर ताटकरे एका पत्राच्या रूपाने भेटायला येतात. हे पत्र मित्रप्रेमाची साक्ष तर देतंच, त्याचबरोबर वाचकाला अनपेक्षित धक्का देत नव्या समांतर कथानकाची रुजवण करतं. सोनावणेंच्या भ्रष्ट यंत्रणेविरुद्धाचा लढा आणि देशप्रेमापोटी भारतात परतलेल्या डॉ. समीर यांचा विज्ञानजगताला थक्क करणारा संशोधनाचा प्रवास हा कादंबरीचा मुख्य गाभा आहे.

रामपूरमध्येच एका वनस्पती संरक्षण व संशोधन केंद्रात रुजू झालेले डॉ.

नवी संहिता... नवा आशय...



- **चिकन सूप फॉर द इंडियन सोल टीन्स टॉक रिलेशनशिप्स**
- **चिकन सूप फॉर द इंडियन सोल टीन्स टॉक रिलेशनशिप्स - भाग २**

बाहेरच्या मोकळ्या पण अनोळखी जगात अडखळती पावलं टाकताना पौगंडावस्थेतील मुला-मुलींना आलेल्या विविधरंगी अनुभवांच्या कथा.

जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन
आणि **रक्षा भारदिया**
अनुवाद
शीला कारखानीस

किंमत प्रत्येकी २४०रु. । पोस्टेज अतिरिक्त
ई-बुक स्वरूपात उपलब्ध



समीर वनस्पतींमधील स्मृतिसदृश प्रथिनांचा शोध अशा ठळक अक्षरांत जेव्हा प्रबंध मांडतात, तेव्हा कादंबरीच्या बीजकथानकाला सुरुवात होते. वनस्पतींतील स्मृती प्रथिनांचा शोध घेणारं यंत्र म्हणजे 'प्लँटोन' कादंबरीचा नायक आहे. या यंत्राची निर्मिती केवळ विज्ञानाची पार्श्वभूमी असलेल्या वाचकालाच थ्रिलर अनुभव देते असं नाही, तर सर्वसामान्य व्यक्तीही 'वनस्पतींना मेंदू आहे का?' या कल्पनेनेच प्रभावित होते. डॉ. समीर यांच्या सहकारी डॉ. अंजली सहसंशोधक म्हणून कार्य करतात. संशोधक संस्थेतील वातावरण देशातील आजच्या रखडलेल्या संशोधनामागचं कारण अगदी लिटमस टेस्टसारखं स्पष्ट करतं. कथानकाच्या निमित्ताने का होईना, सर्वसामान्यांना देशात संशोधन कसं चालतं, प्रकल्प कसे सादर होतात, चर्चा कशी होती आणि देशात कोणकोणत्या संशोधन संस्था आहेत याची तरी जाणीव होते. त्यांची कार्यपद्धती वाचकाच्या नकळत स्मरणात राहते.

वनसंपदेने समृद्ध असलेल्या वनपरिक्षेत्रातील चंदन तस्करी रोखण्यासाठी सोनवणे आटोकाट प्रयत्न करतात; परंतु अगदी वनरक्षकापासून वरिष्ठ अधिकारी, आमदार ते मंत्री अशा अनेकांच्या कुटील साखळीमुळे हे प्रयत्न अपुरे ठरतात. अगदी जीवघेण्या प्रसंगांचाही सामना त्यांना करावा लागतो. अशा वेळी त्यांना दैनिक चव्हाट्यावर या वृत्तपत्राचे वार्ताहर जयंत पाटील, पोलीस सबइन्स्पेक्टर गोविंद पवार यांच्यासारखे कर्तव्यदक्ष संरक्षक लाभतात. डॉ. समीर यांनी वनस्पतींमधील स्मृती प्रथिनांचा घेतलेला शोध, त्याचा चंदनतस्करी रोखण्यासाठी होणारा उपयोग आणि त्याहीपेक्षा सोनवणेंना न्याय मिळवून देण्यासाठी वनस्पतीने दिलेली साक्ष, एक थ्रिलर अनुभव वाचकाला देते. वैज्ञानिक तथ्यांशी कोणतीही तडजोड न करता लेखक अगदी सहजतेने सर्वसामान्य व्यक्तीला विज्ञानाच्या उत्कटतेची सफर घडवून आणतो. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि त्याचं समाजातील महत्त्व अधोरेखित होतं. कथानकाबरोबरच उत्कटतेचा प्रवासही परमोच्च बिंदू गाठतो. वाचकाला जाणवणाऱ्या उत्कटतेला न्याय देणारा वेग कादंबरीने साधला आहे. म्हणजे कादंबरीच्या शेवटी वाढलेला वेग उत्कटतेला पूरक

नवी संहिता... नवा आशय...

- **चिकन सूप फॉर द इंडियन सोल ऑन फ्रेन्डशिप**
- **चिकन सूप फॉर द इंडियन सोल ऑन फ्रेन्डशिप - भाग २**

चिकन सूप – अस्सल भारतीयांसाठी, मित्रांसाठी

जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन

बैसाली चटर्जी दत्त

अनुवाद

डॉ. पूर्णिमा मालशे

किंमत प्रत्येकी २४०रु. । पोस्टेज अतिरिक्त

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

ठरतो. मराठी विज्ञान कादंबरीच्या प्रवासात ही कादंबरी एक मैलाचा दगड ठरेल, यात शंका नाही.

– सम्राट कदम

महासम्राट

विश्वास पाटील हे मराठी साहित्यातील एक मोठे नाव. त्यांच्या अनेक कादंबऱ्या बेस्ट सेलर आहेत. नुकतीच 'महासम्राट' नावाची त्यांची कादंबरी प्रकाशित झाली. कादंबरी १ ऑगस्ट रोजी प्रकाशित झाली व ५ ऑगस्टला माझ्या हाती आली. जसा मिळेल तसा वेळ काढत आज १५ ऑगस्ट रोजी मी ती ४४२ पानांची कादंबरी वाचून पूर्ण केली. हे असे माझ्याबाबतीत पहिल्यांदाच झाले कि पुस्तक प्रकाशित झाल्या झाल्या पंधरा दिवसांच्या आत ते वाचून पूर्ण झाले.

शालेय वयात एक कालखंड असा गेला की तेव्हा एकामागोमाग एक ऐतिहासिक कादंबऱ्या वाचण्याचा सपाटा मी लावला होता. 'स्वामी', 'राऊ', 'मंत्रावेगळा', 'राजश्री', 'जरीपटका', 'श्रीमान योगी' असे लागोपाठ वाचत असतांना भारावल्यासारखा तो काळ मी जगत होतो. अल्लड वय व त्या कादंबऱ्याच्या शब्दातील भावविश्व व मोठा भव्य पट उभा करण्याची कादंबरीकराची ताकद यामुळे शिवकाळ, मराठा साम्राज्य, त्यातील भाषा, व्यवहार, काळ असा जिवंत उभा राहत असे. दुर्दैवाने त्या काळात पानिपत किंवा संभाजी वाचण्यात आली नाही. पण आज अनेक वर्षानंतर पुन्हा एकदा मला त्या झपाटलेपणाचा प्रत्यय आला जेव्हा मी 'महासम्राट' वाचत होतो. छत्रपती शिवरायांच्या जीवनावरील कादंबरीमालेतील हा पहिला खंड आहे ज्याचे नाव आहे 'झंझावात'. यानंतर येणाऱ्या दुसऱ्या भागाचे नाव रणखैंदळ असेल असे लेखकाने प्रस्तावनेत म्हटले आहे. किती भाग येतील ते स्पष्ट केले नाही. झंझावातची सुरुवात जुलै १६२९ मध्ये होते व १६५९ मध्ये अफझलखानाच्या वधापर्यंत येऊन थांबते. सदरील पुस्तक विश्वास पाटील यांनी स्वरदेवता लता मंगेशकर यांना अर्पण केले आहे.

विश्वास पाटील यांच्या कादंबर्याचे बरेचसे विषय ऐतिहासिक असतात.

विशेष म्हणजे त्यातील प्रत्येक विषयावर सखोल अभ्यास व संशोधन ते करतात. मग ती पानिपत असो कि महानायक असो कि संभाजी. त्यांच्या कादंबऱ्या वाचतांना त्यातील त्यांचा अभ्यास, व्यासंग व संशोधन याची जाणीव होते. पण कादंबरीच्या विस्तारात व भाषेत इतक्या बेमालूमपणे मिसळतात कि वाचक कोणत्याही ठिकाणी अडखळत नाही, लिंक तुटत नाही किंवा ग्रीप सुटत नाही. ती त्यांच्या लिखाणाची ताकद आहे.



लिखाणाची शैली चित्रमय आहे. प्रसंग, व्यक्ती व ठिकाण आपल्या डोळ्यापुढे उभे राहतात. सह्याद्रीच्या पर्वतरांगा, विविध घाट, जंगल. प्राणी, शेती शेतकरी... कोसळणारा पाउस व या सर्व पार्श्वभूमीवर आकाराला येत असते पहिल्या स्वराज्याची स्थापना.

या कादंबरीत शाहजी राजांच्या कामगिरीवर विशेष प्रकाश टाकला आहे. शहाजी राजे, जिजाऊ व शिवबा यांच्या एकमेकांच्या आयुष्यातील घटनाची सांगड इतक्या विस्ताराने व अभ्यासाने कदाचित पहिल्यांदाच मराठी कादंबरी विश्वात येत आहे.

प्रस्तावनेतच लेखक म्हणतात की, शहाजीराजे उठसूट दुसऱ्यांच्या चाकऱ्या करत होते, असे धोपटमार्गाने व चुकीच्या पद्धतीने आजवर जे मानले गेले आहे ते अवास्तव आहे. उलट त्या वेळच्या काही अद्भुत घटनांनी व इतिहास प्रवाहाच्या रेट्यामुळेच त्यांना काही ठिकाणी सेवा पत्करावी लागली. त्या सर्व घटनांचे धडधडीत कागदोपत्री पुरावे आज उपलब्ध आहेत. शहाजीराजे भातवडीच्या लढाईत मुघल बादशहा जहांगीर यांच्या फौजेशी तर १६३५ मध्ये बादशहा शहाजहांशी प्रत्यक्ष लढले होते

स्वराज्य स्थापनेचे स्वप्न पाहणे व ते प्रत्येक्षात आणणे हे शिवछत्रपतींनी केले असे आपण मानतो व इतिहास आजपर्यंत आपल्याला तेच सांगतो... या कादंबरीत कळते कि ते स्वप्न पाहणे व त्यासाठीचा पाया रचणे हे तर शहाजी राजांनी केले होते.

शहाजीराजांनी स्वराज्याची पहिली राजधानी उभारली होती ती म्हणजे

पेमगड. जी आजच्या संगमनेर पासून फक्त २८ किलोमीटर अंतरावर आहे. सह्याद्रीच्या रांगेतील बाळेश्वर डोंगराजवळ हा प्राचीन किल्ला होता. तिथे सातवाहन काळातील पाण्याच्या जुन्या टाक्या व कुंडे होते. १६३२ ते १६३५ या काळात एका नामधारी निजामपुत्राला (मुर्तुजा निजामशाह) तख्तावर बसवून येथून शहाजीराजांनी नाशिकच्या गोदावरीपासून ते पुणे परिसरातील भीमेपर्यंतच्या ६४ किल्ल्यांवर स्वतः कारभार चालविला होता. त्यावेळी शिवराय अडीच तीन वर्षांचे असतांना जिजाऊमाता त्यांना घेऊन येथे राहिल्या होत्या

अजून एक महत्वाचा खुलासा या ठिकाणी होतो कि, शिवरायांना त्यांच्या पित्याने गनिमी काव्याची दीक्षा आणि स्वलिखित राजमुद्रा दिली होती. जी राजमुद्रा वयाच्या बाराव्या वर्षापासून राजांनी आपल्या कागदपत्रांमध्ये सन्मानपूर्वक वापरायला सुरुवात केली होती. हि राजमुद्रा स्वतः शहाजीराजांनी रचली होती

याशिवाय कादंबरीतील पानापानांवर अनेक तथ्ये (facts) विखुरलेले आहेत. अलीकडच्या काळातील ही एक महत्वाची ऐतिहासिक कादंबरीमाला ठरेल.

– समाधान महाजन

◆

माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात.
एक : वाचलेली पुस्तकं
दोन : भेटलेली माणसं

मेहता पब्लिशिंग हाऊस

परंपरा पुस्तकांची...
४६ वर्षांची !

खिशाला नको खर्चाचा ताण, पुस्तकांच्या उत्सवाला येऊ दे उधाण...

उत्सव पुस्तकांचा

आमच्या सर्व पुस्तकांवर...
३५% आणि
५०% सूट

सवलत किमान
₹१५०० च्या
मूळ किंमतीवर !

(एका पुस्तकाची एकच प्रत)

१ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर २०२२
वेळ - सकाळी ९.३० ते सायं.८.३०



सालाबादप्रमाणे यंदाही ऑक्टोबरमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर भरवल्या जाणाऱ्या आपल्या 'उत्सव पुस्तकांचा' या पुस्तक प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व पुस्तक विक्रेत्यांची नावे आणि पत्ता खालीलप्रमाणे आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे – ४११०३०
९४२२३२३०३९ / ०२० – २४४६०३१३
sales@mehtapublishinghouse.com

मेहता बुक सेलर्स
३२२ भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाशेजारी, कोल्हापूर – ४१६०१२
९८२३०१५३१९०२३१२५२२३०४
mehtabooksellers@gmail.com

पुस्तक पेठ
१ गोशिबा पार्क, डिसुझा कॉलनी, मिलिट्री सर्कल जवळ, कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५.
✆९१५८६८४५७४
pustakpethnashik@gmail.com

उदय एजन्सीज
३८२८, घुमारे लेन, श्रीपाद ग्रंथ भांडार समोर, शनी चौक, अहमदनगर -४१४००१.
✆९९२२६६४९७९
udayagencies03@gmail.com

साहित्य प्रसार केंद्र
नेहरू मार्ग, सीताबर्डी, नागपूर - ४४००१२. ✆९४२२११२७२०
sahityaprasarkendra@rediffmail.com

टिकार बुक्स एम्पोरियम
क्लब ले आउट, स्टेट बँक रोड, बुलडाणा - ४४३००१.
✆९६८९४८००३२
tikarbooksemporium@gmail.com

शुभम साहित्य ग्रंथप्रदर्शन
बळवंत वाचनालय, औरंगपुरा, औरंगाबाद - ४३१००१.
✆९९२१६८०६७२
kunalombase41@gmail.com

आयडियल पुस्तक त्रिवेणी
छबिलदास रोड, दादर (पश्चिम) मुंबई - ४०००२८. ✆९८९२७३६३८२
ideal101@rediffmail.com

साहित्ययात्रा
१५/१०४, विजय पार्क, कासारवडवली, घोडबंदर रोड ठाणे
✆९५९४७७८४३७
shaileshwaze71@gmail.com

मनोज पुस्तकालय
गल्ली नं. ५/६, परोळा रोड कॉर्नर, धुळे ४२४००१
✆९४२३४९५८९२
manojpustakalaya@rediffmail.com

बलशेटवार बुक सेलर्स
५, सदशिव पेठ, पंचमुखी गणेश मंदिराजवळ, सातारा - ४१५००२.
✆०२१६२-२३५०७३/२३९७९२
mangeshbalshetwar@gmail.com

ग्रंथ द बुक वर्ल्ड
लेन नंबर ५, राजारामपुरी, मेन रोड जवळ कोल्हापूर - ४१६००८.
✆२५३५३५५/९९२२२९५५२२

अभिषेक बुक सेंटर
गीता भवन, जयस्तंभ रोड, रत्नागिरी
✆९५११९९७५३१

अभिषेक बुक सेंटर
मराठा समाज हॉल, डॉ. आंबेडकर रोड, एस टी स्टँड जवळ, सांगली
✆७२९५०८३७२३

अभिषेक बुक सेंटर
वनिता समाज हॉल, राजकमल चौक, अमरावती ✆९८५०८६१६६९

अभिषेक बुक सेंटर
श्री हनुमान नाट्यगृह, श्री हनुमान मंदिरासमोर, म्हापसा, गोवा
✆८७८८९३१७६२

भारतीय पुस्तकालय
गीतांजली मार्केट, मेन रोड, लातूर - ४१३५१२. ✆९४२१४५३५८४
bharateeyapustakalay@gmail.com

नंदादीप सर्व्हिस
२३६/१ साखर पेठ, विणकर गार्डन शेजारी सोलापूर – ४१३००५
✆९८२२८०७७१५
ramakanthboddul@gmail.com

शुभम बुक
सर्व्हे नं. ४, तीन हत्ती चौक, धनकवडी, पुणे – ४११०४३
✆ ९८५०३५१०३५

सत्यजित बुक एजन्सी, निगडी
सिटी प्राइड स्कूल, महापौर ग्राऊंड, भेळ चौक, निगडी पुणे ४११०४४
✆ ७७०९९१६१३२

सत्यजित बुक एजन्सी, रावेत
लंडन बिज, नॅनो हाऊस, रावेत, पुणे - ४१२१०१
✆ ९४२१६९४१४८

◆

१६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२१ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान खास सवलत

१६ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन

'नाथ हा माझा...', 'रेशीमगाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ५६५/- । सवलत किंमत ३९९/-

---

१६ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन

'रुचिरा भाग-१', 'रुचिरा भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३९९/-

---

१७ सप्टेंबर - अनंत पै यांचा जन्मदिन

'आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र', 'आत्मविश्वासाचा कानमंत्र', 'उत्तम स्मृतींचा कानमंत्र', 'यशाचा कानमंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

---

१८ सप्टेंबर - लान्स आर्मस्ट्रॉंग यांचा जन्मदिन

'इट्स नॉट अबाउट द बाइक' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १४९/-

---

१९ सप्टेंबर - शरद दळवी यांचा जन्मदिन

'चित्रमय बोधकथा भाग-१(तीन पुस्तकांचा संच)', 'चित्रमय रंगतदार कथा मालिका भाग-१०', 'चित्रमय रंगतदार कथा मालिका भाग-११' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ७४०/- । सवलत किंमत ४४९/-

'एकलव्य' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-

२१ सप्टेंबर - स्नेहल जोशी यांचा जन्मदिन

'नीलकंठ', 'प्लँचेट', 'तळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-

---

२१ सप्टेंबर - ख्रिस गेल यांचा जन्मदिन

'सिक्स मशिन' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

---

२१ सप्टेंबर - दीपा पोरे यांचा जन्मदिन

'ज्ञानदा निबंधमाला' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ११०/- । सवलत किंमत ६९/-

---

२३ सप्टेंबर - डी.एस. इटोकर जन्मदिन

'A to Z विज्ञान', 'छंदातून विज्ञान', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणी विज्ञानाची', 'खेळणीच खेळणी', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'साधी यंत्रे', 'वाचनातून विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'विज्ञानातील गमतीजमती', 'विज्ञानातील रंजकता' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ११८०/- । सवलत किंमत ६४९/-

---

२३ सप्टेंबर - रेई किमुरा जन्मदिन

'जॅपनीज रोझ', 'जॅपनीज ऑर्किड', 'जॅपनीज मॅग्नोलिया', 'मी एरिक', 'आवा मारू - टायटॅनिक ऑफ जपान', 'अ नोट फ्रॉम इचियो', 'वादळफूल', 'मदाम बटरफ्लाय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत १७७०/- । सवलत किंमत ९८९/-

---

२६ सप्टेंबर - दिलिप दोंदे यांचा जन्मदिन

'सागरी परिक्रमेचा पराक्रम' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

---

२९ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन

'चित्रमय रंगतदार कथा भाग-१३', 'जादूचं रबर आणि इतर गोष्टी, 'जंगल जंमत

मालिका भाग-२, 'पंचतंत्रातील गोष्टी (पाच पुस्तकांचा संच)' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत १०६०/- । सवलत किंमत ५९९/-

---

२९ सप्टेंबर - जागतिक हृदय दिन

'चला जाणून घेऊ या! हार्ट अॅटॅक', 'हृदयविकार निवारण', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चला जाणून घेऊ या!ध्यानसाधना', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ६६५- । सवलत किंमत ३९९/-

---

३० सप्टेंबर - एली वायझल यांचा जन्मदिन

'नाइट' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ९९/-

---

३० सप्टेंबर - जागतिक अनुवाद दिन

सर्व अनुवादित पुस्तकांवर ३५ टक्के सवलत.

(किमान खरेदी १०००रु.)

खालील संचांवर १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत

१ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन

'संवादु अनुवादु', 'केतकरवहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ३९९/-

---

१ ऑक्टोबर - अपर्णा वेलणकर यांचा जन्मदिन

'फॉर हिअर, ऑर टू गो?' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-

---

१ ऑक्टोबर - डॉ. व्ही अरविंद यांचा जन्मदिन

'दृष्टिदाता' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २५३/-

२ ऑक्टोबर - गांधी जयंती

'दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी', 'लेट्स किल गांधी!', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'मोहनदास', 'फ्रिडम ॲट मिडनाइट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १६०५/- । सवलत किंमत ९४९/-

३ ऑक्टोबर - गुरुचरण दास यांचा जन्मदिन

'द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४४९/-

८ ऑक्टोबर - तहमिमा अनम यांचा जन्मदिन

'आहे कट्टर तरी...', 'तेच दिन सोनेरी...', 'झुबेदा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ७९९/-

९ ऑक्टोबर - सुधा मेनन यांचा जन्मदिन

'आघाडीचे महिला नेतृत्व', 'दिव्यगुणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५७५/- । सवलत किंमत ३४९/-

१० ऑक्टोबर - आर.के. नारायण यांचा जन्मदिन

'हलवाई', 'वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३४९/-

१२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन

'आंधळी', 'आंधळ्याचे डोळे', 'अनोळख', 'अनुबंध', 'चौघीजणी', 'गवती समुद्र', 'गोंदण', 'कविता स्मरणातल्या', 'किनारे मनाचे', 'लेखक आणि लेखने', 'मेघदूत', 'निमित्तानिमित्ताने...', 'पावसाआधीचा पाऊस', 'पूर्वसंध्या', 'रंगरेषा', 'रेशीमरेघा', 'सांगावेसे वाटले म्हणून', 'संस्मरणे', 'सुवर्णमुद्रा', 'वर्षा', 'त्रिवेणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३१८५/- । सवलत किंमत १९११/-

१२ ऑक्टोबर - प्रोतिमा बेदी यांचा जन्मदिन

'टाईमपास' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-

१४ ऑक्टोबर - डॉ. अरुण मांडे यांचा जन्मदिन

'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत २००/- । सवलत किंमत ११०/-

१५ ऑक्टोबर - डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

'अदम्य जिद्द', 'माझी जीवनयात्रा...', 'टर्निंग पॉइंट्स', 'योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ६६०/- । सवलत किंमत ३९९/-

१५ ऑक्टोबर - मारिओ पुझो यांचा जन्मदिन

'ओमेर्ता', 'द लास्ट डॉन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ४४९/-

◆

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा

या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com

ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ
डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर लिखित
'करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब'
या आगामी पुस्तकाचा
हस्तलिखित हस्तांतरण सोहळा
नुकताच पार पडला.
यावेळी हस्तलिखित स्वीकारताना
'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या
रुपा मेहता आणि इतर

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/09/2022 Posting Date : 11/09/2022

नवीन संहिता... नवा आशय...







मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

_____

_____

_____